cmyk

## संपादकीय

### विश्वासाचे नाते लोप पावतेय, जे गंभीर आहे

गेल्या काही महिन्यांत प्रेयसीने प्रियकराला संपवल्याच्या अथवा पत्नीने पतीला संपवल्याच्या बातम्या सोशल मीडियावर झळकत आहेत. संबंधांत विश्वासाचा अभाव आणि कृतघ्नतेचा कळस गाठणारी विकृती दर्शवणाऱ्या या घटना समाज माध्यमांवर विनोदी स्वरूपात सादर केल्या जात आहेत. अ‍ॅरेंज मॅरेज केले तरी पुरुषाचा पत्नीकडून घात होतो आणि प्रेम विवाह केला तरी घातच होतो असे त्यातून सूचित करायचे आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### देशाला नक्षलवादमुक्त बनवणारच-अमित शहा

लखनौ : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी देशाला ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवादमुक्त बनवण्याच्या निर्धाराचा पुनरूच्चार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कारकिर्दीत देश सुरक्षित बनला आहे. काही वर्षांपूर्वी देशातील ११ राज्यांमध्ये नक्षलवाद फैलावला होता. आता तो केवळ ३ जिल्ह्यांमध्येच अस्तित्वात आहे, असा दावा त्यांनी केला. उत्तरप्रदेशातील नागरिक पोलीस कॉन्स्टेबल्सना नियुक्तीपत्रे प्रदान करण्याच्या सोहळ्यात शहा बोलत होते. दहशतवादाच्या मुद्द्यावरून त्यांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठवली. देशात काँग्रेसची सत्ता असताना दहशतवादी हल्ले नित्याची बाब बनली होती. मोदींच्या कार्यकाळात पाकिस्तानच्या पाठिंब्याने ३ दहशतवादी हल्ले घडले.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-५३ | सोमवार, दि.१६ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# १० कोटी शेतकऱ्यांची प्रतीक्षा संपणार

## पीएम किसानचा २० वा हप्ता लवकरच जमा होणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेद्वारे एका वर्षात शेतकऱ्यांना तीन समान हप्त्यांमध्ये ६००० रुपये दिले जातात. आता देशातील १० कोटी शेतकऱ्यांची प्रतिक्षा संपणार असून लवकरच पीएम किसानचा २० वा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.**



पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना केंद्र सरकारच्या कृषी आणि ग्रामीण विकास मंत्रालयाकडून चालवली जाते. या योजनेद्वारे पात्र शेतकऱ्यांना एका वर्षात ६००० रुपये दिले जातात. पीएम किसान सन्मान निधीची ही रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. चार महिन्यांच्या अंतरानं पीएम किसान सन्मान निधीचे २००० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येतात. पीएम किसान सन्मान निधीचा १९ वा हप्ता २४ फेब्रुवारी २०२४ मध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला होता. आता चार महिन्यांचा कालावधी पूर्ण होत आल्यानं शेतकऱ्यांच्या खात्यात २० व्या हप्त्याची रक्कम जमा करण्यात येऊ शकते. या योजनेचे १० कोटी लाभार्थी २० व्या हप्त्याची ◀◀ पान २ वर

> **२० वा हप्ता मिळवायचा असेल तर हे काम करा**
>
> पीएम किसानच्या २० व्या हप्त्याचे २००० रुपये मिळवायचे असल्यास शेतकऱ्यांना देखील काही गोष्टींची पूर्तता करणं आवश्यक आहे. पीएम किसान योजनेच्या शेतकऱ्यांनी ईकेवायसी, आधार सीडिंग आणि जमीन रेकॉर्ड पडताळणी पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

> **महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नमोचा हप्ता वेळेत मिळेल का?**
>
> नमो योजनेनुसार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ६००० रुपये दिले जातात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मानच्या ६ हप्त्यांची रक्कम मिळाली आहे. आता त्या योजनेच्या सातव्या हप्त्याची रक्कम कधी मिळणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. कारण सध्या लाडकी बहिण योजनेमुळे इतर योजनेला निधी मिळत नसल्याचे दिसत आहे.

## थोडक्यात...

### राज ठाकरेंचे वादळी व्यक्तीमत्त्व-चंद्रकांत पाटल

मुंबई-भाजप मंत्री चंद्रकांत पाटलांकडून राज ठाकरेंचे कौतुक करण्यात आले आहे. राज ठाकरेंचे वादळी व्यक्तीमत्त्व आहे. वादळाचा जसा थांगपत्ता लागत नाही तसेच काहीस राज ठाकरेंचे आहे, असे म्हणत चंद्रकांत पाटलांनी राज ठाकरेंचे कौतुक केले आहे.

### बाळासाहेब गेल्यानंतरचा कारभार पटला नाही : भरत गोगावले

मुंबई-बाळासाहेब गेल्यानंतरचा कारभार आम्हाला पटला नाही असे खोचक वक्तव्य गोगावलेंनी केले आहे. रश्मी ठाकरेंचा पडद्यामागून हस्तक्षेप होता असा आरोपही गोगावलेंनी केला आहे. तसेच शिंदेंना आघाडीत सीएम बनवले असते तर वेगळे चित्र असते असेही ते म्हणाले.

### दुबार पेरणीचे संकट

गडचिरोली- जिल्ह्यात कापूस मिरची व भात शेतीच्या शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे. मोठा पाऊस ना आल्यास दुबारा पेरणी करण्याचे शेतकऱ्यांच्या मनात भीती आहे. शेतकऱ्यांनी कापसाची पेरणीला सुरुवात केली असून गडचिरोली जिल्ह्यात फक्त रिमझिम पावसाने हजेरी लावली होती

### एकनाथ खडसे यांना महाजनांकडून धक्का

जळगाव-मुक्ताईनगर मतदारसंघातील बोदवड मुक्ताईनगर मधील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेश युवक सचिव विजय चौधरी, काही सरपंच शेकडो कार्यकर्त्यांसह यांनी महाजनांच्या उपस्थिती भाजपात प्रवेश केला.

### ठाकरे ब्रँड अपराजित आणि अजिंक्य-राऊत

मुंबई-महाराष्ट्रात ठाकरे हा जो ब्रँड आहे तो अपराजित आहे अजिंक्य आहे, असे खासदार संजय राऊत म्हणाले. महाराष्ट्रासाठी मराठी माणसासाठी ठाकरे कुटुंबाने जे केला आहे संघर्ष केला आहे त्या केला आहे एक स्वाभिमानी महाराष्ट्र मराठी माणूस घडविला त्याची तुलना कोणाशी होऊ शकत नाही

### राज्यात कोरोनाचा धोका वाढला

मुंबई : राज्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत आहे. राज्यात ५३ नव्या रुग्णांची नोंद झाली असून त्यामुळे रुग्णांची संख्या १ हजार ९६७ वर पोहोचली आहे. मुंबईतील रुग्णांची संख्या ८२९ इतकी झालीये. तसेच राज्यामध्ये कोरोनामुळे दोघांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे मृतांची संख्या २७ वर पोहोचली आहे.

### लोकलमध्ये आता ज्येष्ठांसाठी स्वतंत्र डबा

मुंबई : पश्चिम रेल्वेच्या लोकलमध्ये आता ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा उपलब्ध करुन दिला जाणार आहे. यासाठी ५.४ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. यामध्ये गाडीतील १ लगेज डबा ज्येष्ठ नागरिकांच्या विशेष डब्यात रूपांतरित करण्यात येणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही व्यवस्था रेल्वेकडून करण्यात येत आहे. लोकल गाड्यांमध्ये दररोज सुमारे ५० हजार ज्येष्ठ नागरिक प्रवास करत असून, रेल्वेने ज्येष्ठांना लोकलच्या लगेज डब्यातून प्रवास करण्याची परवानगी द्यावी, असा आदेश न्यायालयाने दिला होता.

### विठ्ठल-रुक्मिणी मातेचे टोकन दर्शन

पंढरपूर : विठ्ठल-रुक्मिणीच्या भक्तांसाठी आनंदाची बातमी असून पंढरपुरात आता श्री विठ्ठल आणि रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांना तासंतास रांगेत उभे राहावे लागणार नाही. कारण टोकन पद्धतीने देवाचे दर्शन भाविकांना घेता येणार आहे. सकाळी १० वाजल्यापासून भाविकांना टोकन दर्शन प्रायोगिक तत्वावर सुरु केले जाणार आहे. दर्शनाचे आरक्षण संकेतस्थळावरुन करता येणार आहे.

## केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर दुर्घटना, ७ ठार; महाराष्ट्रातील तिघांचा समावेश



**डेहराडून । वृतसंस्था**

**उत्तराखंडच्या केदारनाथ धाममध्ये पुन्हा एकदा मोठी दुर्घटना घडली आहे. रविवारी केदारनाथ मार्गावर एक हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह एकूण ७ जण असल्याची माहिती समोर येत आहे. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला** ◀◀ पान २ वर

## इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला; ४ जणांचा बुडून मृत्यू

### ४० पर्यटक वाहून गेल्याची भीती, मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त

**पुणे । प्रतिनिधी**

**मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील जुना पूल रविवारी (१५ जून) दुपारी अचानक कोसळला. या भीषण दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून, २० ते २५ पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने कुंडमळा या प्रसिद्ध पर्यटनस्थळी पर्यटकांची मोठी गर्दी होती. दुपारी साडेतीनच्या सुमारास पूल अचानक कोसळला. या वेळी अनेक पर्यटक आणि काही लहान मुले पुलावर उपस्थित होती. पूल कोसळताच अनेकजण थेट नदीत पडले आणि जोरदार प्रवाहात वाहून गेले. या घटनेनंतर घटनास्थळी मोठा गोंधळ उडाला. घटनास्थळी पिंपरी-चिंचवड पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक प्रशासन दाखल झाले आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, या घटनेत प्राथमिक माहितीनुसार २ लोकांचा मृत्यू झाला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांनी पुढे सांगितले ◀◀ पान २ वर

## महापालिका निवडणुकीबाबत स्थानिक नेत्यांनी रणनीती ठरवावी-शरद पवार

मुंबई । प्रतिनिधी

महापालिका निवडणुकीबाबत आपली रणनीती काय असावी, याबाबत चर्चा करताना आम्ही ठरवले आहे. जिथे निवडणुका आहेत तिथल्या लोकांनी एकत्रित बसून निर्णय घ्यावा. तिथे काय करता येईल, हे त्यांनी ठरवावे. मुंबई पालिकेला आपण सामोरे जात आहोत. आपण स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेत असेल तर त्या निर्णयाच्या पाठीशी पक्ष असेल किंवा तुम्हाला वाटले की आपण बसून इतरांशी चर्चा करायला हवी, तर



त्याबाबत देखील पक्ष पाठीशी असेल, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी रविवारी (दि.१५) कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना स्पष्ट केले.

पवार पुढे म्हणाले की, गेले तीन चार दिवस घसा ठीक नाही त्यामुळे माझ बोलण समजण्यामधे अंतर पडण्याची शक्यता आहे. सगळ्यांनी एकत्रित येऊन संघर्ष करण्याची तयारी करण्यासाठी आजचे शिबिर आयोजित केले आहे. लोकसभा निवडणुका झाल्या एक वेगळी चिंता आपण पाहिली. महाराष्ट्रात आपल्याला लोकसभेला चांगल यश मिळाल. आपण १० ते ११ जागा लढलो परंतु २ जागा जिंकू ◀◀ पान २ वर

## माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्या मृतदेहाची ओळख पटली



**अहमदाबाद । वृत्तसंस्था**

**अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडिया विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या २४१ प्रवाशांपैकी गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या पार्थिवाची रविवारी डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवण्यात आली. सकाळी ११.१० वाजता विजय रुपाणी यांचे डीएनए जुळले. त्यांचे पार्थिव कुटुंबाकडे सोपवण्यात आले.**

गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल म्हणाले की, विजय रुपाणी यांच्यावर राजकोटमध्ये अंत्यसंस्कार केले जातील. दरम्यान, अधिकाऱ्यांनी डीएनए चाचणीद्वारे रविवार पर्यंत ३२ बळींची ओळख पटवली आहे आणि १४ जणांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सुपूर्द करण्यात आले आहेत, असे एका अधिकाऱ्याने एका सांगितले. आतापर्यंत ओळख पटलेले बळी गुजरात आणि ◀◀ पान २ वर

## संतोष देशमुख यांचा मुलगा विराज सैनिकी शाळेत शिकणार

### मुख्यमंत्री फडणवीसांनी दिलेला शब्द पाळला

**मुंबई । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर त्यांच्या कुटुंबियांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी संतोष देशमुख यांचा मुलगा विराज देशमुख यांच्या शिक्षणाची पूर्ण जबाबदारी घेण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता करत, विराज देशमुख याला सांगली जिल्ह्यातील रेठे धरण येथील सैनिकी शाळेत प्रवेश मिळाला आहे.**

यासंदर्भातील अधिकृत पत्र मुख्यमंत्री निवास वर्षा येथे झालेल्या एका कार्यक्रमात, संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना सुपूर्द करण्यात आले. विशेष म्हणजे, विराज देशमुख याच्यासह त्याचा चुलत भाऊ सत्यजित देशमुख यानेही याच सैनिकी शाळेत प्रवेश घेतल्याची माहिती समोर आली आहे.

## राक्षस भुवन नदीपात्रामध्ये अवैध वाळू उपसा करणारे दोघे पकडले

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ; १७ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राक्षस भुवन येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हवेदरीत्या वाळू उपसा करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले असून यावेळी १७ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई १५ जून रोजी करण्यात आली.



पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांनी ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६०.५० क्विंटल | १,८७१ | २,७०० | २,४५० |
| ज्वारी/हायब्रिड : ५०.५० क्विंटल | १,८०० | २,५३५ | २,३५४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०० | २,२०० | २,२०० |
| तूर : १५.०० क्विंटल | ५,८०० | ६,००० | ५,९३३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| बाजरी:७.५० क्विंटल | १,७०० | २,४५० | २,१८० |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:२.०० क्विंटल | ४,१०० | ४,२०० | ४,१५० |
| हरभरा: २८.५० क्विंटल | ५,०३१ | ५,३५१ | ५,२२४ |

## बच्चू कडूंच्या उपोषणातून शेतकऱ्यांना नेमकं काय मिळालं?

### माघार घेण्याचं कारण अद्यापही सामान्यांना कळलं नाही

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या सहा ते सात दिवसापासून प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी अमरावती जिल्ह्यात अन्नत्याग आंदोलन केले. हे आंदोलन विशेषत: शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी होते. त्यामुळे त्यांना राज्यातील शेतकऱ्यांचा पाठिंबा सुद्धा मिळाला. सहा दिवसानंतर बच्चू कडू यांनी हे आंदोलन मागे घेतले. त्यांच्या या उपोषणांमधून शेतकऱ्यांना नेमकं काय मिळालं याचे उत्तर अजूनही मिळाले नाही. यात सरकारने बच्चू कडू यांना गाजर दाखवलं की यामध्ये सरकार आणि बच्चू कडू यांची सेटलमेंट आहे का? असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.**





> **शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या निस्वार्थी नेत्याची गरज**
>
> आज घडीला राज्यामध्ये शेतकऱ्यांसाठी लढणारे अनेक नेते आहेत. मात्र निस्वार्थीपणे शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या नेत्यांची संख्या किती आहे हे सांगणे मात्र कठीण आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना निडर, निस्वार्थ आणि अभ्यासू असा नेता मिळणे ही काळाची गरज आहे.

अमरावती जिल्ह्यामध्ये मोझरी या गावी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन केले. या आंदोलनाची राज्यभर चर्चा झाली, खासदार आमदारांसह महत्त्वाच्या नेत्यांनी त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. प्रहारचे कार्यकर्ते सुद्धा राज्यभरामध्ये आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. बच्चू कडू यांनी एक प्रकारे सरकार समोर आव्हान निर्माण केले होते. आंदोलनाची धार अधिक तीव्र होताना दिसत होती. राज्यभरामधून बच्चू कडू ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# विश्वासाचे नाते लोप पावतेय, जे गंभीर आहे

गेल्या काही महिन्यांत प्रेयसीने प्रियकराला संपवल्याच्या अथवा पत्नीने पतीला संपवल्याच्या बातम्या सोशल मीडियावर झळकत आहेत. संबंधांत विश्वासाचा अभाव आणि कृतघ्नतेचा कळस गाठणारी विकृती दर्शवणाऱ्या या घटना समाज माध्यमांवर विनोदी स्वरूपात सादर केल्या जात आहेत. ॲरेंज मॅरेज केले तरी पुरुषाचा पत्नीकडून घात होतो आणि प्रेम विवाह केला तरी घातच होतो असे त्यातून सूचित करायचे आहे. कशाचा विनोद करायचा हा ज्याच्या त्याच्या स्वभावाचा भाग असतो. तथापि, या सर्व प्रकरणातून एक बाब निश्चित झाली आहे की समाजात विश्वास आणि संबंधांतील सामंजस्याला एवढा तडा गेला आहे की हे पतन पाहून हादरायला होते.

हत्यांच्या या घटनांमुळे आणखी एका नव्या चर्चेलाही सुरुवात झाली आहे. या चर्चेचा प्रवास काही जणांनी अनेक शतके मागेपर्यंत नेला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की महिलांना जेव्हा चूल आणि मूल एवढेच मर्यादित ठेवले होते तोपर्यंत बरे होते. त्यांना कथित स्वातंत्र्य दिले गेल्यामुळेच आज असले गुन्हे होऊ लागले आहेत. महिलांची कार्यालय अथवा अन्यत्र प्रेमप्रकरणे, त्याकरता पतीचीच फसवणूक आणि या प्रकारांत मुलांचा अडसर होत असल्यामुळे आपल्याच मुलांची हत्या करणे आदी प्रकारही महिला करत आहेत. हे त्यांना मोकळे सोडल्यामुळे झाल्याचा दावा त्या चर्चांमधील काही जण करत आहेत. अर्थात, हा चुकीचा आणि उलट दिशेने जाणारा प्रवास आहे. जर तुम्ही दोन-चार घटनांवरून काळीच बाजू पाहण्याचा आणि मांडण्याचा प्रयत्न केला तर त्याचे समर्थन करता येत नाही. गुन्हेगारी घटनांची नोंद ठेवणाऱ्या एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार होणाऱ्या एकूण गुन्ह्यांत ९० ते ९२ टक्के गुन्हे पुरूष करतात. महिलांचा गुन्ह्यांत सहभाग असण्याचे प्रमाण ६ ते ८ टक्के आहे. आकडेवारीत सगळे काही स्पष्ट होते. पण येथे प्रश्न पुरूष आणि महिला असा नाहीच आहे. तो आहे गुन्ह्यांचा आणि गुन्हे थांबले पाहिजेत याचा. सराईत गुन्हेगार, इर्षा-स्पर्धा-द्वेष किंवा अन्य काही कारणांमुळे गुन्हेगारीकडे वळणे आणि त्यातून अघोरी कृत्य करणे हा भाग वेगळा. समाजाची मान्यता लाभलेल्या किंवा समाजाची रचनाच ज्या नात्याच्या पायावर आधारलेली आहे त्या पती-पत्नीच्या नात्यात परस्परांविरूद्ध केले जाणारे गुन्हे वेगळे. अगोदर फरक समजून घेतला पाहिजे. राजा आणि सोनमचे प्रकरण गाजत असतानाच महाराष्ट्रात एक आणि अन्यत्र एक अशा दोन घटना घडल्या. यातील महाराष्ट्रातील घटनेत २७ वर्षीय पत्नीने डोक्यात कुऱ्हाड घालून ४५ वर्षीय पतीची हत्या केली. एका घटनेत कलिंगडामध्ये विष मिसळून पत्नीने पतीला ठार केल्याचीही बातमी आहे. हे सगळे गुन्हेच आहेत. पुरूष-महिला समानता वगैरे निकष त्याला लावले जाऊ नये. तसेच एखाद्या महिलेने गुन्हा केला म्हणून त्याचे गांभीर्य सौम्यही होता कामा नये. एकीकडे महिला सशक्त होत आहेत असे म्हटले जाते. त्याचवेळी गुन्ह्यात तिच्या सहभागाची पुष्टी झाली तर महिला असे करू शकत नाही असे म्हणण्यालाही काही अर्थ नसतो. गुन्हा करणारी प्रत्येक व्यक्ती थेट अविचाराने कृत्य करत नसते.

एखाद्याला अथवा एखादीला संपवण्याचा विचार हा अविचार असतोच, मात्र त्या निर्णयाप्रत कोणी अचानक येत नसतो. त्यामागे एक विचारचक्र अगोदरपासूनच सक्रिय झालेले असते. आपल्यावर अन्याय झाला, आपल्याला हे नको ते हवे आहे, आपल्या इच्छेविरूद्ध हे सगळे घडते आहे, मला सूड घ्यायचा आहे अशी अनेक कारणे त्यामागे असतात आणि त्यानुसार गुन्हा केला जातो. वर म्हटल्याप्रमाणे पती-पत्नीचे नाते यात बसत नव्हते. विवाहांमध्ये सामान्यत: हुंडा अथवा अन्य कारणांनी महिलांवरच अन्याय झाला आहे. पतीच्या बाहेरख्याली पणाची किंवा मूल होत नसल्यामुळे किंवा मुलीच होत असल्यामुळे महिलेला प्रसंगी मृत्यूला कवटाळावे लागले आहे.

अशा असंख्य घटना घडल्या आहेत. त्या सातत्याने ऐकल्या आणि पाहिल्या गेल्यामुळे त्याचे गांभीर्य बहुदा कमी झाले. मात्र महिलांनी त्यांच्या हेतूपूर्तीसाठी पतीची हत्या करण्याचा प्रकार जो समोर येतो आहे त्याचा पूर्वी कधी विचारच केला नव्हता म्हणून हादरवतो आहे. इच्छेविरूद्ध लादले जाणे आणि संबंधांत असलेला विश्वासाचा अभाव हेच याचे कारण आहे. कुटुंबातील एक सदस्यच दुसऱ्या सदस्यावर विश्वास ठेवत नसेल तर जगात कोणीच कोणावर विश्वास ठेवू शकणार नाही. विवाह संस्थाच आता ठिसूळ झाली असे म्हणून हा प्रश्न निकालीही काढता येणार नाही कारण ही संस्था बाद केली जाऊ शकत नाही आणि होऊही शकत नाही. त्यावर तोडगा म्हणून 'लिव्ह इन रिलेशनशीप' आदी उपाय केले गेले तरी शेवटी त्या रिलेशनलाही तेच स्वरूप अखेर प्राप्त होत असते जे विवाहातील संबंधांना असते. या सगळ्यावर विश्वासाचे नाते दृढ करणे आणि संयमाने प्रत्येक गोष्टीचा सामना करणे हाच उपाय असू शकतो. दुर्दैवाने तेच लोप पावत आहे.

# पंतप्रधान मोदींमुळे सुशासन' ही देशाची संस्कृती बनली-ना.पंकजाताई मुंडे

## अमरावतीत भाजपचा 'संकल्प से सिध्दी' उपक्रम : ना. पंकजाताईंनी साधला कार्यकर्त्यांशी संवाद

अमरावती । प्रतिनिधी

**देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा गेल्या अकरा वर्षांचा कार्यकाळ देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिला जाईल. भारताच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी याकाळात करण्यात आली असून सरकार म्हणजे सेवा या हेतूने काम केले जात आहे. मोदींमुळे सुशासन ही देशाची संस्कृती बनली आहे, असे सांगत त्यांच्या योजना सर्व सामान्यापर्यंत पोचवा असं आवाहन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला अकरा वर्ष पुर्ण होत आहेत या पार्श्वभूमीवर संपुर्ण देशात भाजपातर्फे 'संकल्प से सिद्धी' हा उपक्रम राबविला जात आहे, याचाच एक भाग म्हणून ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरात कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या. मोदी सरकारच्या लोक कल्याण कारी कामाचा लेखाजोखा मांडताना पंकजाताई पुढे बोलतांना म्हणाल्या, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली ज्या गोष्टी साध्य झाल्या त्यात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला तर विकासाला गती मिळते, भाजपा सरकार जेथे जेथे आहे तेथे तेथे गरिबांचा विकास झाला आहे, सरकार म्हणजे सेवा या हेतूने काम केले जाते या गोष्टींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. गेल्या ११ वर्षात भारताने अमृत काळात विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. भ्रष्टाचार मुक्त कारभार, सामान्य माणसाला योजनांचा थेट लाभ, आयुष्यमान भारत, पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था, जनधन योजना, ऑपरेशन सिंदूर अशी कितीतरी चांगली कामे झाली आहेत. यासाठी मोदी सरकारच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या विविध विकास योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम आपण सर्वांनी करावे असे ना. पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांना केले. यावेळी शहराध्यक्ष डॉ .नितीन धांडे, जिल्हाध्यक्ष प्रभुदास बिलावलेकर, रविराज देशमुख, प्रवक्ते शिवराज कुलकर्णी, जयंत डेहणकर, ललित समदूरकर, युवा मोर्चाचे बादल कुलकर्णी, कौशिक अग्रवाल, राजु कुरील, सुनील काळे, संजय नरवणे, कुसुमताई साहू, राधा कुरीळ यांच्यासह भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### अंबादेवी मंदिरात 'नो प्लास्टिक मोहीम'

ना. पंकजाताई मुंडे यांनी सकाळी शहरातील सुप्रसिद्ध श्री.अंबादेवी मंदिरात देवीचे मनोभावे दर्शन घेतले. तसेच, आई एकवीरा मातेचे देखील दर्शन घेऊन सप्त गोमाता प्रदक्षिणा मंदिरातील गोशाळेस भेट दिली. उपस्थित भाविक भक्तांना कापडी पिशव्यांचे वाटप करून एकल प्लॅस्टिक बंदीबाबत मार्गदर्शन केले. तत्पूर्वी, मंदिर ट्रस्ट च्या वतीने करण्यात आलेला स्नेहसत्कार स्विकारला.

# सुरक्षा रक्षकाच्या मारहाणीत बीडच्या व्यक्तीचा मृत्यू

## पोलिसांकडून खरी माहिती देण्यास टाळाटाळ?

अबडू । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यामधील एक व्यक्ती चोरी करण्याच्या उद्देशावरून आल्या असल्याचे चर्चा होती परंतु चोरी केली का नाही या उद्देशाने त्याला बेदाम मारहाण करून त्याचा जीव घेण्यात आला. याप्रकरणी रोहिलागडचे बीट जमादार तसेच पोलीस उपनिरीक्षक यांच्याकडून घडलेल्या घटनेची माहिती घेण्याचा प्रयत्न केले असता त्यांनी घडलेल्या घटना संदर्भात कोणतीही माहिती देण्यात आली नाही याप्रकरणी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी चौकशी करणे गरजेचे आहे.**

अंबड तालुक्यात ग्रामीण भागात चोरांचा सुळसुळाट वाढला असून चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरट्याला पकडून त्याला केलेल्या मारहाणीमध्ये एका चोरट्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रोहिलागड येथे १४ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली. तसेच घटनेस्थळी सीसीटीव्ही कॅमेरे असण्याचे गरजेचे होते परंतु होते का नाही यासंदर्भात उलट सुलट चर्चा सुरू आहे. याप्रकरणी अंबड पोलिसांनी प्रारंभी ७ जणांना ताब्यात घेतले असल्याचे समजते परंतु खरा गुन्हा दाखल रात्री उशिरापर्यंत कोणावरही करण्यात आला नसल्याचे समजते. त्यानंतर केवळ ३ जण ताब्यात असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. मयत संशयीत चोरट्याचे नांव उमाराव काळे रा. सिधोर जि. बीड असे आहे. सदरील घटना अंबड तालुक्यातील रोहिलागड शिवारातील टाटा सोलार पॅनल पॅन्टवर शनिवारी रात्री चोरटे केबल चोरीच्या उद्देशाने गेले. यावेळी आवाज आल्याने सोलार पॅन्टवर असलेल्या दक्ष सुरक्षा रक्षकांनी आरडाओरड केली व चोराला पकडले. त्याला लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान, साथीदार मित्र पकडला गेला असल्याचे समजताच बाहेर उभे असलेले संशयीत चोरटे पळून गेले. या मारझोडीत उमाराव काळे यास गंभीर मार लागल्याने त्याची प्रकृती गंभीर झाली. या घटनेची माहिती समोर आली. गंभीर मारहाण झालेल्या उमाराव काळे यास जालना येथे रुग्णालयात पाठवण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यास मृत घोषीत केले. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत अंबड पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा नोंद टाळाटाळ करण्यात येत होता.

# 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत'-मंत्री प्रताप सरनाईक

## राज्य परिवहन महामंडळ विशेष मोहिम राबविणार

मुंबई । प्रतिनिधी

**शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही मोहिम राबविण्यात येणार असून आता एसटीचे पास थेट त्यांच्या शाळा-महाविद्यालयात वितरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.**

मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जूनपासून सुरू होत आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनकडून पास घेतले जात असत. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळावे लागणार नाही. त्यांच्या शाळा महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून संबंधितांना त्यांचे पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. यामुळे त्यांचा शैक्षणिक वेळ वाया जाणार नाही.



एसटी महामंडळाच्या माध्यमातून 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम १६ जूनपासून राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन पासची आवश्यकता असणाऱ्या शाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होणार असल्याचेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले आहे.

# प्रधानमंत्री व मुख्यमंत्री यांचे विचार घराघरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची-आ.लोणीकर

## जि.प.पंचायत समिती नगरपालिका महानगरपालिका निवडणुकीसाठी सज्ज रहा-कुचे

जालना । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांचे विचार तळागाळातील प्रत्येक घराघरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची असून, सबका साथ सबका विकास सबका विश्वास हे मोदीजींचे ब्रीद ध्यानात घेऊन कार्यकर्त्यांसोबत समरस होत संघटना वाढीसाठी पदाधिकाऱ्यांनी काम करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

ते परतुर येथे भाजपा च्या तालुका कार्यकारणी व विविध आघाड्या प्रकोष्ट च्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र वाटप समारंभ तसेच नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आ नारायण कुचे यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, परतूर मंडळाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले बद्रिनारायण ढवळे अशोकराव बरकुले यांच्यासह इतर कार्यकर्त्यांची उपस्थिती होती . दरम्यान जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांच्या सत्काराच्या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर यांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका महानगरपालिकेचे रणसिंग फुंकले असल्याची चर्चा जोरदारपणे चर्चिली जात होती. आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती जालना महानगरपालिका व नगरपालिका निवडणुकीमध्ये आपल्या सगळ्यांना जिद्दीने उतरायचे असून सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सत्ता मिळवायचे असल्याचे यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची बोलताना त्यांनी सांगितले पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की पक्ष संघटनेत काम करत असताना तुझा भाऊ न बाळगता कार्यकर्त्यांच्या माध्यमातून थेट तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या योजना पोहोचवण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले.

पुढे आमदार लोणीकर म्हणाली की, भारतीय जनता पार्टीची एकनिष्ठ राहणाऱ्या कार्यकर्त्याला पक्षाच्या माध्यमातून विविध पदावर काम करण्याची संधी दिली जाते व त्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्याचे काम पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून व्हावे अशी अपेक्षा यावेळी त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली . पुढे बोलताना ते म्हणाले की केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकार यांच्या माध्यमातून अनेक वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जात असून या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले परम कर्तव्य असून हे करत असतानाच संघटनेत नवयुवक, युवतींना संघटनेत प्रवाहित करण्याची जबाबदारी ही आपली असल्याचे त्यांनी नमूद केले यावेळी जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे म्हणाले की, पक्ष संघटनेचे काम करत असताना स्वतःला झोकून देत पदाधिकाऱ्यांनी जीवाचे रान करून गावागावा पर्यंत संघटना पोहोचवत येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्वच आघाड्यांवर भारतीय जनता पार्टीला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत रहावे, या माध्यमातून वाडी वस्ती झोपडपट्टीवरील कार्यकर्ता भारतीय जनता पार्टीच्या विचाराशी जोडण्यासाठी पोषक वातावरण तयार करून या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याची जबाबदारी पदाधिकाऱ्यांची असल्याचे सांगितले यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की , पदाधिकारी म्हणून आपली जबाबदारी चोखपणे निभावताना ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांची जाळे निर्माण करतानाच येणारी परतूर नगरपालिकेचे निवडणूक आपण जिंकणारच असा विश्वास व्यक्त केला आपले सर्वांचे नेते आमदार बबनराव लोणीकर सक्षम असून, येणाऱ्या अडचणीवर मात करत आपल्याला प्रत्येकाला संघटनेला बळकटी देण्याचे काम करावयाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काही लोक रस्ता चुकले होते त्यांनी वंचित बहुजन आघाडी शिवसेने मध्ये काम केले




मात्र खरा न्याय भारतीय जनता पक्ष देऊ शकतो आमदार बबनराव लोणीकर घेऊ शकतात हे ध्यानात येताच अनेकांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांचा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर भारतीय जनता पार्टी कार्यकारणी, भाजप कार्यकारणी, ओबीसी मोर्चा कार्यकारणी, यासह सर्व प्रकोष्ट सेलच्या नूतन पदाधिकाऱ्यांना आमदार बबनराव लोणीकर आमदार नारायण कुचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आली या कार्यक्रमाला यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते नागरिकांची उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### १० कोटी शेतकऱ्यांची

रक्कम कधी मिळणार याची वाट पाहत आहेत. मीडिया रिपोर्टनुसार पीएम किसानच्या २० व्या हप्त्याची रक्कम २० जूनच्या दरम्यान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाऊ शकते. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याची रक्कम १० कोटी ४ लाख ६७ हजार ६९३ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली होती. आता १० कोटी शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याची प्रतीक्षा आहे. केंद्र सरकारकडून पीएम किसान योजनेसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रुपये दिले जातात. केंद्र सरकारने या योजनेची घोषणा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी केली होती. त्याची अंमलबजावणी फेब्रुवारी २०१९ पासून करण्यात आली. सुरुवातीपासून आतापर्यंत ३.०४ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेचे लाभार्थी योजनेच्या वेबसाईटवर जाऊन किती हप्त्यांची रक्कम मिळाली. यासंदर्भातील माहिती आणि इतर तपशील तपासू शकतात. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या शेतकऱ्यांना आतापर्यंत १९ हप्त्यांची रक्कम मिळालेली आहे. म्हणजेच जे शेतकरी पहिल्या हप्त्यापासून लाभार्थी आहेत त्यांना त्यांना ३८ हजार रुपये मिळाले आहेत.

------------

### इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला;

की, ६ जणांना आतापर्यंत वाचविण्यात यश आले आहे. सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ३२ लोक जखमी झाले असून, त्यापैकी ६ गंभीर आहेत. त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सीएम फडणवीस पुढे म्हणाले, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि संबधित तहसीलदार यांच्याशी मी सातत्याने संपर्कात आहे. काही जण वाहून गेल्याने त्यांचा युद्धपातळीवर शोध घेतला जात आहे. घटनास्थळी एनडीआरएफला पाचरण करण्यात आले आहे. मदत कार्याला तातडीने वेग देण्यात आला आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे. रविवार असल्याने पर्यटकांची संख्या जास्त होती, त्यामुळे हानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. काही मोटारसायकल सुद्धा नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूल कोसळल्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. स्थानिक प्रशासन, अग्निशमन दल आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दल यांच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली.

------------

### केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर दुर्घटना,

आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाले. ही दुर्घटना गौरीकुंड आणि त्रिजुगीनारायण दरम्यान घडली. हेलिकॉप्टर क्रॅश होण्याचे कारण खराब हवामान असल्याचे सांगितले जात आहे. चारधाम यात्रेदरम्यान वेगवेगळ्या धामांवर हेलिकॉप्टर अनेक वेळा क्रॅश झाले आहेत. तसेच हेलिकॉप्टरचे अनेक वेळा आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. अलीकडेच रस्त्याच्या मधोमध हेलिकॉप्टरचे लँडिंग करण्यात आले. चारधाम यात्रेच्या सुरुवातीला एक हेलिकॉप्टर क्रॅश झाले, ज्यामध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला. हेलिकॉप्टरमध्ये एका लहान मुलासह ७ जणांचा मृत्यू झाला आहे. प्रवासी हे उत्तराखंड, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील आहेत. मृतांमध्ये महाराष्ट्रातील ३५ वर्षीय श्रद्धा राजकुमार जैसवाल आणि ४१ वर्षीय राजकुमार सुरेश जैसवाल यांच्यासह दोन वर्षीय काशी या मुलीचा समावेश आहे. तर विक्रम (उत्तराखंड), विनोद देवी (६६, उत्तर प्रदेश), तुस्थी सिंग (१९, उत्तर प्रदेश), कॅप. राजीवसिंग चौहान (पायलट) यांचाही समावेश आहे.

----------

### माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी

राजस्थानमधील वेगवेगळ्या ठिकाणचे होते, असे अतिरिक्त नागरी अधीक्षक डॉ. रजनीश पटेल यांनी पत्रकारांना सांगितले. अनेक मृतदेह ओळखण्यापलीकडे जळाले आहेत, त्यामुळे या दुर्घटनेतील बळींची ओळख पटविण्यासाठी अधिकारी डीएनए चाचण्या करत आहेत. अधिकाऱ्यांनी आधी सांगितले होते की, पीडितांच्या कुटुंबियांशी समन्वय साधण्यासाठी २३० पथके तयार करण्यात आली आहेत.

-------------

### महापालिका निवडणुकीबाबत

शकलो नाही. आज देशाच्या संसदेत आपले खासदार आहेत ते एका विचाराने महाराष्ट्राबाबत चांगल्या पद्धतीने विषय मांडतात. लोकसभेला चांगलं यश मिळाल मात्र विधानसभेला तसं चित्र राहिलं नाही. निवडणुक यंत्रणेबाबत लोकांच्या मनात संशय आहे. राहुल गांधी यांनी एक लेख देखील त्याबाबत लिहिला होता. विधानसभा निकाल अस्वस्थ करणारा होता. मात्र पक्षाचा सामान्य कार्यकर्ता मजबूत आहे. आज एका वेगळ्या परिस्थितून आपला देश जात आहे. अनेक मान्यवरांनी काय नीती असावी, याबाबत भूमिका मांडली आहे. आज वेगळे चित्र दिसत आहे. इस्त्राईल सारखा देश शेतात चांगले काम करत आहे. मात्र, दुसरीकडे गाझा मध्ये जे होत आहे, ते वाईट आहे. हे होतं असताना सगळे देश स्तब्ध झाले आहेत. जगात अशा गोष्टी घडत असताना भारत आधी एक भूमिका घ्यायचा, आज देशाची सूत्रे ज्यांच्या हातात आहे, ते देशाची भूमिका कधी मांडत नाहीत. मध्यंतरी काश्मीर मधे काही लोकांची हत्या झाली. ते त्यानंतर देश अस्वस्थ होता. त्यावेळी केंद्राची जबाबदारी होती मशीन गण घेऊन येणाऱ्याच्या विरोधात भूमिका घेणं अपेक्षित होते. काश्मिरी लोकांचे आभार मानतो. त्याठिकाणी स्पेशल अधिवेशन झाले आणि त्यांनी आपण सर्वांच्या सोबत आहोत, असे सांगितले. हा दृष्टीकोन अतिशय महत्त्वाचा आहे. परंतु ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांनी स्वच्छ आणि स्पष्ट भूमिका न घेण हे योग्य घ्यायला पाहिजे, असे पवार म्हणाले.

-------------

### राक्षस भुवन नदीपात्रामध्ये अवैध

अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करण्यासाठी अवैध धंद्ये करणारांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत. त्यावरुन दिनांक १५ जून रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे चकलांबा हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, ईसमनामे अक्षय पोटफडे व करण पोटफेडे हे ट्रॅक्टर, लोडर व ट्रॉली च्या सहाय्याने राक्षस भुवन नदी पात्र मधून अवैध रित्या वाळू उपसा करत आहेत. यावरुन सदर ठिकाणी दोन पंचाना पाचारण करुन पोलीस स्टाफसह पोलीस उपनिरीक्षक विघ्ने यांचे टीम ने राक्षस भुवन नदी पात्र येथे अचानक छापा टाकला असता अक्षय पोटफडे व करण पोटफेडे हे लोडरचे सहाय्याने अवैध रित्या कोणताही परवाना नसताना वाळू उपसा करत असताना मिळून आले. त्याचे ताब्यातून २ ट्रॅक्टर ,लोडर,ट्रॉली व दीड ब्रास वाळू असा १७,०६००० रू चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपीस पोलीस स्टेशन चकलांबा येथे हजर करुन त्याचे विरुध्द पोउपनि महेश विघ्ने स्थागुशा,बीड यांनी सरकार तर्फे फिर्याद देवुन गु.र.नं २१३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) भा.न्या. सअन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनित काँवत पोलीस , अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने , स.फो, जयभाये,पोह/ राजु पठाण, महेश जोगदंड,राहुल शिंदे, पो अं /बप्पासाहेब घोडके, चालक सुनील राठोड यांनी मिळुन केलेली आहे.

--------------

### बच्चू कडूंच्या उपोषणातून शेतकऱ्यांना

यांना वाढता पाठिंबा मिळत होता. त्यामुळे कुठेतरी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळेल असे वाटू लागले असतानाच बच्चू कडू यांनी मंत्री उदय सामंत यांच्या मध्यस्थीने उपोषण सोडले. यावेळी सरकारच्या वतीने बच्चू कडू यांना एक आश्वासनाचे पत्र देण्यात आले. त्यामध्ये दिव्यांग नागरिकांना वाढीव मानधन यासह शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासंदर्भात समिती स्थापन करणे. यासह विविध मुद्दे होते. मात्र यामध्ये समिती स्थापन कधी केली जाईल?, समिती किती कालावधीमध्ये सरकारला अहवाल सादर करेल? राज्य सरकार किती कालावधीमध्ये शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर करेल? याबाबत कसलाही उल्लेख नव्हता. तरीसुद्धा बच्चू कडू यांनी हे आंदोलन थांबवण्याचे जाहीर केले त्यामुळे एक प्रकारे कर्जमाफीची आशा लावून बसलेल्या शेतकऱ्यांचा हिरमोड झाला आहे. लाडकी बहीण योजनेमुळे सुरू असलेल्या अनेक योजनांचा निधी वळवला जात आहे. अनेक योजनांना निधी उपलब्ध करून दिला जात नाही, अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये असताना राज्य सरकार कर्जमाफी नेमकी कोणत्या आधारावर करणार आहे याचे उत्तर सुद्धा यावेळी मंत्री यांच्याकडून सामान्य नागरिकांना मिळालेले नाही. तसेच या बाबतीमध्ये बच्चू कडू यांनी सुद्धा खुलासा केलेला नाही. त्यामुळे बच्चू कडू यांना जे राज्य सरकारच्या वतीने आश्वासने दिली गेली ती गाजर दाखवण्याचा प्रकार तर नाही ना? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शिवाय राज्य सरकारकडून ठोस असे आश्वासन किंवा कृती शेतकरी कर्जमाफी संदर्भात होताना दिसत नाही तरीही बच्चू कडू यांनी हे आंदोलन मागे घेतले त्यामुळे कुठेतरी पाणी मुरतंय अशी शंका आता शेतकऱ्यांना येऊ लागली आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १६ जुन २०२५



## शेख मोहंमद दानिशचे निट परीक्षेत ५६७ गुण मिळवून यश



बीड प्रतिनिधी

बीड येथील विद्यार्थी शेख मोहम्मद दानिश मुबारक याने वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सी ( निट) मार्फत घेण्यात आलेल्या नॅशनल एलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट ( निट) मध्ये मोठे यश संपादन केले आहे. त्याला ७२० पैकी ५६७ गुण मिळाले आहेत.

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या अभ्यासक्रमाची परीक्षा मे २०२५ मध्ये घेण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करणाऱ्या या परीक्षेचा निकाल शनिवारी दुपारी ऑनलाइन जाहीर करण्यात आला. या परीक्षेत रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र या तीन विषयांसाठी एकूण ७२० गुण होते. शहरातील ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलचा विद्यार्थी शेख मोहम्मद दानिश मुबारक याने जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमाच्या बळावर हे यश संपादित केले आहे. त्याने देश पातळीवर ओबीसी श्रेणीतून -६२७९ रँक मिळवला आहे.

# आ.प्रकाश सोळंके यांच्या पुढाकारातून कुंडलिका पाईपलाईनचा प्रश्न लागतोय मार्गी

## शहरात विविध विकास कामांना आला वेग

धारूर। प्रतिनिधी

धारूर शहरात मागील साडेतीन वर्षापासून नगरपरिषदेमध्ये प्रशासक राज आहे. या काळामध्ये लोकप्रतिनिधी आ प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली मागील आठ वर्षापासून प्रलंबित असलेली कुंडलिका पाईपलाईनचा प्रश्न तसेच शहरातील विविध धार्मिक स्थळ, शहरातील रस्ते सह विविध विकास कामांना वेग आला असून शहरात मोठ्या प्रमाणात विकास कामे मार्गी लागले आहेत तर येणाऱ्या काही दिवसांमध्ये आणखी विकास कामे शहरांमध्ये होणार असल्याचे बोलले जात आहे. पाणी रस्ते प्रश्न मार्गी लागत असल्याने धारूरकर आ प्रकाश सोळंके यांचे आभार मानत आहेत.

स्थानिक स्वराज्य निवडणूक लांबणीवर पडल्याने धारूर नगर परिषदेमध्ये मागील साडेतीन वर्षापासून प्रशासक असून प्रशासक काळामध्ये धारूर शहरामध्ये नागरिकांच्या मूलभूत प्रश्नासाठी आमदार प्रकाश सोळंके यांनी अनेक महत्वाचे प्रश्न सह लोकांच्या हिताचे कामे मुख्याधिकारी - प्रशासक महेश गायकवाड यांच्या कार्यकाळामध्ये मार्गी लावले. धनेगाव तलावातून होणारा पाणीपुरवठा सतत काही ना काही कारणाने बंद पडतो यामुळे धारूर शहराला काही ना काही आधार मिळावा म्हणून तात्काळ ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या तलावातून शहराला १ कोटी ६५ लाख रुपयाची पाईपलाईन मंजूर करून तात्काळ सुरू करून पाणी धारूर शहराला सुरू केले यामुळे या पाईपलांचा आधार धारूर करांना मिळाला. तसेच शहरातील मुस्लिम समशान भूमी, शादी खाना ,धार्मिक स्थळांना कंपाउंड वॉल सह इतर कामांना मोठ्या प्रमाणात निधी देऊन कामे मार्गी लावली. तसेच शहरातील दत्त मंदिर, धारेश्वर मंदिर, वीरशैव लिंगायत मठ, सह शहरातील रस्ते नाली असे महत्वपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करून मार्गी लावण्याचे काम आ प्रकाश सोळंके यांनी केले. तसेच मुख्य बाजारपेठ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नागरी रुग्णालय , काशिनाथ चौक ते हनुमान मंदिर कसबा विभाग या रस्त्यासाठी १५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून नाली व रस्त्याचे काम सुरू झाले आहे. धारूर येथील जीर्ण झालेल्या बस स्थानकाचा प्रश्न मार्गी लावून बसणकाचे नव्याने इमारतीसाठी टेंडर प्रक्रिया सुरू झाली आहे.मागील आठ वर्षापासून रखडलेली कुंडलिका पाईपलाईन ही धारूरकरांची तहान भागवणारी योजना बंद पडलेली असताना ती नव्याने सुरू करून यासाठी नव्याने ५४ कोटीचा निधी उपलब्ध करून योजनेचे काम युद्धपातळीवर सुरू केले. या कुंडलिका पाईपलाईन मध्ये पर्यायी एक नवीन पाईपलाईन तसेच बाजारपेठ ,कसबा विभाग, केज रोड या भागाला नवीन पाणी साठवण टाक्या उभा करणार आहेत. तसेच नगरपरिषदेला कुंडलिका पाईपलाईन झाल्यावर लाईट बिल भरणा मोठ्या प्रमाणात येईल यासाठी करोडो रुपये निधी पाणीपुरवठा योजनेत आणून त्यामध्ये सोलर प्लांट उभा करणार असल्याने लाईट बिल चा ताण नगरपालिकेवर येणार नाही व पाणीपुरवठा सुरळीत होणार. या योजनेमुळे धारूरकरांची कित्येक वर्षाची तहान भागणार आहे . धारूरकरांचा येणाऱ्या दिवसांमध्ये पाण्याचा प्रश्न शंभर टक्के मार्गी लागणार असल्याने धारूरकरांनी आमदार प्रकाश सोळंके यांचे आभार मानले.



### धारूरकरांचे प्रश्न मार्गी–नितीन शिनगारे

धारूर शहरात मागील साडेतीन वर्षापासून प्रशासक असल्याने आ प्रकाश सोळंके यांच्या माध्यमातून शहरात विविध विकास कामे यामध्ये रस्ते, सभागृह ,शादी खाना सह विविध विकासकामांना चालना मिळाली, तसेच ऐतिहासिक किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या तलावातून तात्काळ एक कोटी ६५ लाख रुपयांची पाईपलाईन मंजूर करून काम पूर्ण करून पाणी सुरू केले. तसेच कित्येक वर्षापासून रखडलेली कुंडलिका पाईपलाईन धारूकरांचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागत आहे . पाईपलाईन साठी ५४ कोटीचा निधी उपलब्ध करून काम युद्धपातळीवर सुरू केले. या योजनेतून धारुकरांची तहान भागणार असून लहान मोठ्या लघु उद्योगांनाही पाणी उपलब्ध झाल्यास चालना मिळणार आहे.



## चौसाळा येथील बस स्थानकाच्या बांधकामाला ग्रहण ; महामंडळाचे दुर्लक्ष

चौसाळा

येथील नव्याने सुरू असलेल्या एसटी महामंडळाच्या नवीन बस स्थानकाच्या बांधकामाला आता ग्रहण लागलेले आहे बांधकामावर गुत्तेदारासह महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे लक्ष नसल्याने सदर बांधकाम हे कासवाच्या गतीने सुरू असून रेंगाळत असल्याचे दिसत आहे सदर प्रकरणी माहिती अशी आहे की शासनाच्या वतीने चौसाळा नवीन बस स्थानकाच्या बांधकामाला शासनाने जवळपास ७ कोटीचा निधी मंजूर केलेला आहे सदर बांधकाम सुरूही करण्यात आलेले आहे परंतु गेल्या आठ दिवसापासून हे बांधकाम रखडले असल्याचे कळते सदर बांधकामावर कमी प्रमाणात मजूर असल्याचे ही कळते

तसेच या बस स्थानका चे बांधकाम सुरू झाल्यामुळे बस स्थानकावर येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना प्रवासी निवारा उभा करण्यात आला आहे परंतु त्यामध्ये बसण्याची व्यवस्था अजूनही केलेली नाही त्यामुळे प्रवाशांची कुचंबना होत आहे तसेच या बस स्टॅन्ड मध्ये बस स्टॅन्डचे बांधकाम सुरू होण्यापूर्वी म्हणजे तीन महिन्यापूर्वी या बस स्टॅन्ड मधले दहा ते पंधरा झाडे हे तोडून एका बाजूला ढिगारा करण्यात आला होता चा ढिगार्याचा लिलाव न करता एसटी अधिकाऱ्याने तो ढिगारा तसाच ठेवल्याने त्याच्यातील ७५ टक्के लाकडं हे चोरीस गेलेले आहेत तरीही अजूनही पूर्ण दुर्लक्ष करून एसटी महामंडळ काय साधत आहे आसा जनतेतून प्रश्न निर्माण होत आहे



## रस्त्यामधोमध वाहनांमुळे व अतिक्रमणामुळे शहरात वाहतुकीची मोठी समस्या



अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील विविध चौकात रस्त्यालगत मोठी व दुचाकी वाहने चाललेली व उभी करून ठेवली जात असल्याने वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. त्यामुळे काही प्रमाणात अपघात देखील झाल्याचे ऐकीवात आहे. पोलीस प्रशासनाने आणि वाहतुक पोलीसांनी ही कोंडी दुर करण्यासाठी तातडीची उपाययोजना करावी अशी नागरिकांतुन होत आहे.

रस्त्याच्या बाजुला वाहने उभे करून ठेवली जातात आणि चालविणारे व्यवस्थित चालवित नाहीत त्यानी जर ती कोंडी कोंडी दुर करण्यासाठी मदत होईल शिवाय इतर व्यावसायीक आपले दुकानातील सामान रस्त्यावर मांडतात त्या अतिक्रमणामुळे गर्दी होते त्यामुळे वाहनांना नागरिकांना व दुचाकी धारकांना अडचण होते. योगेश्वरीदेवी मंदीर , पाटिल चौक,या मुख्य चौकात मार्ग काढणे कठीण होते. आणि रस्त्यावर विद्यार्थी महिला, आणि पुरूष, ज्येष्ठ नागरिक यांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. काही मार्गावर एकेरी वाहतुकीचीही गरज आहे.शहराच्या साठे चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नगर परिषद परिसर, स्वा. सावरकर चौक, योगेश्वरी प्राथमिक वाहनांची रेलचेल असते त्यामुळे तिथे सतत वाहतुक पोलिस आवश्यक आहे. परंतु त्या ठिकाणी नसल्याकारणामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे नगर परिषद, पोलीस प्रशासन या विभागाने लक्ष घालुन ही समस्या सोडविली पाहिजे. त्यातूनच काही भागात रस्त्यावरच रिक्षा उभ्या असतातआणि मुख्य गोष्ट म्हणजे सर्वच चौकात भाजी विक्रेते हातगाडे उभे असतात त्यांना उभे राहण्यासाठी जागा दिल्यास वाहतुक काही प्रमाणात सुरळीत होईल ती उपाय योजना करावी अशी ही नागरिकांची मागणी आहे.

## बिंदुसरा नदीकाठचा परिसर स्वच्छ

### नदीकाठी झाडे लावणार –नाईकवाडे

बीड/ प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी बिंदुसरा नदी शेजारील मोंढा रोड कडून श्री संत सावता माळी महाराज मंदिरासमोरील रोड जो पुढे जैन भवन मार्गे सुभाष रोडला जोडला जातो या भागात स्वच्छता मोहीम घेण्यात यावी अशी सूचना मुख्याधिकारी श्रीमती अंधारे मॅडम यांनी केली होती. माजी नगरसेवक अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी केलेल्या सूचनेची दखल घेत काल वरील भागात आमच्यासह स्वतः मुख्याधिकाऱ्यांनी उपस्थित राहून मोहिमेची पाहणी केली.

बिंदुसरा नदीच्या पश्चिम भागात थेट सुभाष रोड पर्यंत जो रस्ता आहे त्याच्या बाजूने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात यावे व खास करून त्या भागात बांबू व तत्सम प्रकारची झाडी लावण्यात यावी अशी सूचना देखील यावेळी अमर नाईकवाडे व त्यांचे सहकारी फारूक पटेल यांनी केली. यास सकारात्मक प्रतिसाद लवकरच वृक्षारोपण सुरू करू असे मुख्याधिकाऱ्यांनी आश्वासित केले. यासोबतच बिंदुसरा नदी शेजारील खासबाग देवी मंदिर, मोमीनपुरा, सोमेश्वर नगर आदी भागात देखील याच पद्धतीने स्वच्छता मोहीम करून वृक्षारोपण करण्यात यावे अशी सूचना देखील मुख्याधिकाऱ्यांना केली. यावेळी अमर नाईकवाडे यांच्यासह बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे, गटनेते फारूक पटेल, माजी नगरसेवक अशफाक इनामदार परिसरातील नागरिक, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी वर्ग व श्री संत सावता प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.



## जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अन्नदान करून वाढदिवस साजरा

बीड प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस यंदा खास पद्धतीने साजरा करण्यात आला. बीडमधील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राज्याच्या उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने हा वाढदिवस अनाथ व बेघर नागरिकांसोबत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात अन्नदान करण्यात आले आणि गरजू नागरिकांना भरपेट जेवण दिले गेले. यानंतर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. राज ठाकरे यांच्या प्रतिमेसमोर केक कापून उपस्थितांमध्ये वाटप करण्यात आले आणि वाढदिवसाचा आनंद सर्वांसोबत सामायिक करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्षाताई जगदाळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात विविध उपक्रम राबवले. त्या या केंद्रातील बेघर, गरजू लोकांच्या मदतीस नेहमीच तत्पर असतात. वाढदिवसाच्या निमित्तानेही त्यांनी या परंपरेला पुढे नेत आपुलकीची भावना जोपासली. या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये बीड जिल्हाध्यक्षा आशाताई कुटे, जिल्हा उपाध्यक्षा कल्पनाताई कवठेकर, जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ बिडवे, बीड शहराध्यक्ष पठाण अमर जान, शास्त्री कुटे, अभिजीत वैद्य आणि काळजीवाहक छायाताई यांचा सहभाग होता.

कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला आणि सामाजिक जाणिवेचा आदर्श घालून दिला.



# जालन्यातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर स्मारकाला ना.पंकजा मुंडे यांची भेट

## स्मारकाच्या बांधकामासाठी निधी देण्याची केली घोषणा

जालना । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या शहरात उभारण्यात येत असलेल्या स्मारकाला राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज भेट देऊन बांधकामाची पाहणी केली. स्मारकाला निधी देण्याची घोषणा करतानाच याचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू अशी ग्वाही त्यांनी स्मारक समितीला दिली. ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडल्यानंतर शहरातील अंबड चौफुली परिसरात उभारण्यात येत असलेल्या २४ फुट उंचीच्या देशातील सर्वात उंच 'हिंदूधर्मरक्षिका महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाची पाहणी केली.हिंदू संस्कृतीच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे हे देशातील सर्वात उंच अहिल्यादेवी स्मारक ठरणार आहे.स्मारकाच्या पार्श्वभूमीला ऐतिहासिक महेश्वर किल्ला व इंदूर राजवाडा यांच्या संकल्पनेचा मिलाफ साधणारी २८ फूट उंच व ५६ फूट रुंद दगडी भिंत उभारली जाणार आहे, जी या स्मारकाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.



या भव्य प्रकल्पासाठी आवश्यक तो वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची हमी ना. पंकजाताई मुंडे यांनी स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी ना. पंकजाताईंचे समितीच्या वतीने जोरदार स्वागत केले. या प्रसंगी खा. कल्याण काळे, आ. नारायण कुचे, आ. बबनराव लोणीकर, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ साहेब, मनपा आयुक्त संतोष खांडेकर, स्मारक समितीचे अध्यक्ष कपील दहेकर, सचिव शांतीलाल बनसोडे, संतोष लवटे, अक्षय आटोळे, भगवान माथले, अनिल यशवंते गणेश वाघावामरे ज्ञानेश्वर भुसारे शिवराम विर गोविंद मगदूरे विजय खटके बळीराम नेमाने गजानन आढाव आकाश हिवाळे आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोमेश कदम यांच्याकडून पत्रकार , पोलीस कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस बीड जिल्हा मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांच्याकडून आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस यांचा गौरव करत रेनकोट देवून अनोख्या पध्दतीने साजरा केला आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस राज्यभरात मनसैनिक वेगवेगळी शिबिरे राबवून साजरे करत असतात बीड जिल्हा मनसेने मात्र जनतेच्या सेवेसाठी आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस सदैव तत्पर असतात त्यांचा गौरव होणे गरजेचे आहे असा मनोमन निर्णय एकमताने घेवून दि.१४ जून २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार बांधवांचा आणि बस स्टँण्ड येथील पोलीस चौकीमधील पोलीस कर्मचार्यांना रेनकोट देवून सन्मान केला आहे.

यावेळी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांच्यासह सिद्धेश्वर धोंडगे, कृष्णा देवकुळ, केशव रत्नपारखे , गणेश भोसले, टिनू राजपूत आदी मनसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

cmyk

# राज्यातील सिंचन प्रकल्पासह उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे यंत्रनेला निर्देश

मुंबई : राज्याची सिंचन क्षमता वाढवण्यासाठी राज्यातील ३८१ सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून ३० लाख ६८ हजार ६७३ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. तर ४५ उदंचन प्रकल्पांच्या माध्यमातून ६२ हजार १२५ मेगावॅट वीज निर्मिती, तर ९६ हजार १९० रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याचे विकासचक्र वेगवान करण्यासाठी सिंचन प्रकल्प आणि उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे कालबध्दरित्या गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांना दिलेल्या प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता यांच्या प्रगतीचा आढावा, तसेच पंपस्टोरेज धोरणासंदर्भात सामंजस्य करारांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि गिरीश महाजन उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,



राज्यातील सिंचन प्रकल्प कृषी अर्थव्यवस्थेला चालना देणारे आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून अधिकचे सिंचन क्षेत्र निर्माण होणार असल्याने राज्यातील शेतकऱ्याचे जीवन अधिक सुसह्य होईल. उदंचन जलविद्युत प्रकल्पाद्वारे पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीसाठी या प्रकल्पांच्या पूर्णत्वाला विलंब होऊ नये. शासनाने दोन वर्षापासून विविध सिंचन प्रकल्पांच्या १८५ कामांना प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. या सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून २६ लाख ६५ हजार ९०९ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. तर विशेष दुरुस्तीसाठी १९६ कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. विशेष दुरुस्तीच्या माध्यमातून ४ लाख २ हजार ७६४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. ऊर्जा स्वावलंबनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पंपस्टोरेज धोरणांतर्गत केलेल्या सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील १५ कंपन्यांसोबत ३ लाख ४१ हजार ७२१ कोटीचे २४ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यामुळे राज्यात ६२ हजार १२५ मेगावॅट वीज निर्मिती होऊन ९६ हजार १९० रोजगार निर्माण होणार आहे. जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणातून प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या सिंचन प्रकल्पांची झालेले कामे व निर्माण झालेले सिंचन क्षेत्र याची माहिती दिली.

बैठकीस मुख्यमंत्री सचिवालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, विदर्भ, तापी, कोकण, गोदावरी, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# जनावर पावसात भिजल्यास अशी घ्या काळजी

पावसात जर गोठा नीट झाकलेला नसेल, चाऱ्याची नीट व्यवस्था नसेल तर सर्वात मोठा फटका या मुक्या जनावरांना बसतो. त्यांच्या नजरेतला तो त्रास बघताना काळजाचं पाणी होतं. पावसात भिजल्यामुळे त्यांना काय काय सहन करावं लागतं, हे जाणून घेतले पाहिजे.

भजल्यामुळे जनावरांना होणारा त्रास व त्याचे परिणाम :

अंग थरथर कापत असते. ताप, सर्दी, ठसक्याचा त्रास होतो. पावसात भिजलेलं अंग ताप येण्याची सुरुवात असते पण ते सांगू शकत नाहीत. थंडीने निमोनिया होतो, फुफ्फुस बिघडतं- जीव धोक्यात येतो. पायातील ताण तणाव- चिखलामध्ये तासनतास उभं राहून पाय सडतात, सुजतात तसेच चालता येत नाही. कासेचे आजार, सड ओले राहिल्यास स्तनदाहाचा धोका संभवतो तसेच दूध दूषित होते परिणामी जनावराला वेदना सहन करता येत नाहीत. जनावराला अशक्तपणा येतो, दूध उत्पादन कमी होतं पण तेही कुणाला सांगत नाहीत. भूक मंदावते, खाणं-पिणं कमी होतं कारण पोट बिघडलेलं असतं. ओला चारा खाताना पचन बिघडतं. पोट फुगतं,तसेच दुखतंही. गोठा ओला असेल तर गोठ्यात जंतूसंसर्ग वाढतो त्यामुळे गोठ्यात आजार वाढतात. चिखलात पडून पाय मोडतात, अंग दुखते. डोळे लाल होतात, कान सुजतात, त्वचेवर बुरशी आणि तरीही ते शांतच राहतात. जनावरांना झोपही लागत नाही, कारण अंग सतत ओलसर आणि थंड असते. सारखे भिजल्यामुळे जनावरे आजारी पडतात आणि हळूहळू मरणाच्या जवळ जातात. आपल्याला हे सर्व उशिरा कळते तेव्हा फार उशीर झालेला असतो. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच गोठ्याची झाकण व्यवस्था, चाऱ्याची साठवणूक, कोरडा गोठा व स्वच्छ जागा, औषधपाणी आणि नियमित तपासणी ही सगळी काळजी घ्या. कधीकधी आपण वेळेत घेतलेल्या निर्णयामुळे एक जीव वाचू शकतो.



# विद्राव्य खतांची फवारणी करण्याची वेळ



पिकाच्या अन्नद्रव्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पिकाच्या वाढीची अवस्था आणि जमिनीतील ओलावा यानुसार योग्य त्या विद्राव्य खतांचा वापर केल्यास जास्त फायदा होतो. विद्राव्य खते का वापरावीत?, विद्राव्य खतांचं महत्त्व आणि विद्राव्य खतांची फवारणी नेमकी केंव्हा करावी? याविषयीची माहिती घेतल्यास चांगला फायदा होतो.

रासायनिक खताचे भौतिक गुणधर्म, आकार, घनता यावरून घन खते, द्रव खते, पाण्यात विरघळणारी म्हणजेच विद्राव्य खते असे प्रमुख तीन प्रकार पडतात. विद्राव्य खते ही घन खताप्रमाणेच असतात. पण ती पाण्यात विरघळणारी असतात. याशिवाय विद्रायव्य खतामध्ये एक किंवा अन्य अन्नद्रव्यांचा समावेश असू शकतो.

विद्राव्य खते वापराण्याची फायदे : हवामानातील बदल, जमिनीचा प्रकार, सुपीकता, ओलावा, उपलब्ध अन्नद्रव्ये, पीक संरक्षण आणि व्यवस्थापन या सर्व बाबींचा पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर तसेच गुणवत्तेवर परिणाम दिसून येतो. त्याच प्रमाणे पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार अन्नद्रव्याची गरज बदलत असते. पारंपरिक पद्धतीमध्ये आपण जमिनीतून एकदा किंवा दोन वेळा विभागून रासायनिक खते देतो.पण विद्राव्य खते सिंचनाच्या पाण्यासोबत देता येत असल्यामुळे पिकाच्या गरजेप्रमाणे अनेक वेळा विभागून देता येतात. त्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ लागत नाही. तातडीने पुरवठा करायचा असल्यास फवारणीद्वारेही विद्राव्य खते देता येतात.

विद्राव्य खतांचे महत्त्व : विद्राव्य खते ही रासायनिक घन खतांच्या तुलनेत पिकांना लवकर उपलब्ध होतात. अन्नद्रव्याचा लगेच पुरवठा करायचा असल्यास ही खते फवारणी करुनही देता येतात. विद्राव्य खतांमुळे पिकांचे उत्पादन आणि रासायनिक खताचा वापर यात सांगड घालणं सोपं जातं. याशिवाय या खतांमुळे जमिनीच्या गुणधर्मावर परिणाम होत नाही. तसचं विद्राव्य खते ही अनेक वेळा विभागून देता येतात. विद्राव्य खते पिकांच्या मुळांच्या कार्यकक्षेतून निचरा होण्याची किंवा वायुरूपात वाया जाण्याची शक्यता कमी असते.

विद्राव्य खतांची फवारणी केंव्हा करावी? पिकाला जास्त दिवसांपासून जमिनीतून खत देणे शक्य न झाल्यास विद्राव्य खताची फवारणी करावी. जास्त पाण्यामुळे किंवा पाण्याच्या ताणामुळे रासायनिक खताची मात्रा देण्यासाठी उशीर होत असल्यास आणि भरपूर पाने-फुले असताना आवश्यकतेप्रमाणे जमिनीमधून खतांचा पुरवठा होत नसल्यास विद्राव्य खतांची फवारणी करावी. विशेष करुन पिकामध्ये कमतरतेची लक्षणे दिसू लागल्यास तातडीने अन्नद्रव्याच्या पुरवठ्यासाठी फवारणीतून खते देण्याचं नियोजन करावे. अशाप्रकारे विद्राव्य खताची निवड करुन फवारणी योग्य वेळेस केल्यास खते वाया न जाता त्या खताचा योग्य वापर होईल.

# ऊस पिकासाठी पाण्याचा अपव्यय टाळा; ठिबक सिंचन ठरेल प्रभावी पद्धत

उसाची शेती करताना बहुतेक शेतकरी उसाला पाणी देण्यासाठी पारंपरिक प्रवाही पाट (सरी-वरंबा)पद्धतीचा वापर करतात. पण त्यामुळे होणारा पाण्याचा अनावश्यक वपार टाळण्यासाठी ठिबक सिंचन ही पद्धती उपयुक्त ठरते.

ठिबक सिंचन पद्धतीने कमी अंतराने म्हणजेच दर दिवशी अथवा एक दिवस आड कमी प्रवाहाने परंतु जास्त कालावधीसाठी पाणी दिल्यास जमिनीमध्ये पिकांच्या मुळाशी पाण्याचे अपेक्षित व योग्य प्रकारे उभे-आडवे प्रसारण होते आणि मुळांची वाढ चांगली खोलवर होते त्यामुळे ऊस पिकाची जोमदार वाढ होऊन भरी उत्पादन मिळते यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार योग्य ठिबक सिंचन पद्धतीची निवड करणे, दोन ठिबक नळ्यांमध्ये योग्य अंतर व ड्रीपरचा प्रवाह निश्चित करणे महत्त्वाचे आहे. कमी कालावधी मध्ये सिंचन पूर्ण करण्यासाठी जास्त प्रवाह असणारे ड्रीपर वापरण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो परंतु हे शास्त्रीय दृष्टिकोनातून चुकीचे आहे.

उसासाठी ठिबक सिंचन : याकरिता शक्यतो सोळा मिलिमीटर व्यासाची इनलाईन ड्रीप वापरावी. मध्यम खोल जमिनीत दोन ठिबक सिंचन नळ्यातील अंतर कमीत कमी १.५० मीटर (५फूट) असावे तर जास्तीत जास्त खोलीच्या काळ्या जमिनीत दोन ठिबक सिंचन नळ्यातील अंतर १.८० मिटर (६फूट) असावे.



दोन ड्रीपर मधील अंतर ४० सेंटिमीटर व प्रवाह ताशी १.६ किंवा दोन लिटर असावा. भूमिगत ठिबक सिंचनासाठी दाब नियंत्रित इनलाईन ड्रीपर करावी. दोन ड्रीपर मधील अंतर ४०सेमी तर ड्रीपरचा प्रवाह दर ताशी१.६ किंवा २ लिटर असावा. एका शिफ्टमध्ये जास्त क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी ताशी एक लिटर प्रवाह देणारे ड्रीपर असणारी इनलाईन वापरणे फायदेशीर ठरते.

प्रवाही पद्धतीच्या तुलनेत ठिबक सिंचनचे फायदे : या पद्धतीत वाढीच्या अवस्थेनुसार पाणी आणि खतांचे योग्य नियंत्रण करता येते. जमिनीमध्ये पिकाच्या मुळ्या पाशी अन्न पाणी व हवा यांचे संतुलित प्रमाणात ठेवणे शक्य होते. उसाची उगवण लवकर म्हणजे पंचवीस ते तीस दिवसात एक सारखी व जास्त प्रमाणात होते. प्रचलित सरी-वरंबा पद्धतीच्या तुलनेमध्ये पाण्यात ४५ ते ५० टक्के बचत होते. पाणी वापर कार्यक्षमता दुप्पट ते अडीच पटीने वाढते. विद्राव्य खतांचा वापर थेट मुळांपाशी होत असल्याने पारंपरिक पद्धतीच्या तुलनेमध्ये खतांमध्ये ३० टक्के बचत होते. तणांचा प्रादुर्भाव कमी होऊन आंतरमशागत खुरपणी किंवा तणनाशकांचा खर्च कमी होतो. विज खर्चात ३५ ते ४५ टक्के बचत होते. पाणी व खते देण्यासाठी कमी मजूर लागतात. एकूणच उत्पादन खर्चात २० टक्क्यांपर्यंत बचत होते. ऊस उत्पादनात ३० टक्के तर साखर उताऱ्यात ०.५ युनिटने वाढ होते. जमिनीची सुपीकता व उत्पादनक्षमता टिकून राहण्यास मदत होते.देखभाल कशी कराल : महिन्यातून एकदा न चुकता पहिल्यांदा सबमेव व नंतर ड्रीप लाईन फ्लश कराव्यात त्यात साठलेली घाण निघून जाईल. पाणी परीक्षण अहवालानुसार आम्ल प्रक्रिया करावी. उसाच्या मुळ्या ठिबक लाईन मध्ये घुसू नयेत म्हणून तणनाशकाची प्रक्रिया शिफारसीप्रमाणे करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८५८ : अठराशे सत्तावनच्या संग्रामातील मोरारची लढाई
१९०३ : फोर्ड मोटर कंपनीची स्थापना.
१९११ : एन्डिकोट, न्यूयॉर्क येथे द कॉम्प्युटिंग टॅब्युलेटिंग अँड रेकॉर्डिंग कंपनीची स्थापना झाली. याच कंपनीचे पुढे आय. बी. एम. या बलाढ्य कंपनीत रुपांतर झाले.
१९१४ : सहा वर्षाच्या तुरुंगवासातून लोकमान्य टिळक यांची सुटका
१९४७ : नव्या, कल्पक उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने म. स. तथा 'बाबुराव' पारखे यांनी मराठा चेंबरच्या वतीने कै. गो. स. पारखे औद्योगिक पारितोषिक देण्यास सुरुवात केली.
१९६३ : व्हॅलेन्तिना तेरेश्कोवा या रशियन महिलेने वोस्तोक ६ या यानातून अंतराळप्रवास करुन जगातील पहिला अंतराळ वीरांगना होण्याचा मान मिळवला.
१९९० : मुंबई व उपनगरात दिवसभरातील सर्वाधिक वृष्टी झाली. गेल्या १०४ वर्षातील जूनमधे एका दिवसात पडलेल्या पावसाचा (६००.४२ मि.मि.) उच्चांक गाठला गेला.
२०१० : तंबाखूवर पूर्णपणे बंदी करणारा भूतान हा जगातील पहिला देश बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : ॲडम स्मिथ स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१९२० : हेमंत कुमार मुखोपाध्याय, प्रसिद्ध गायक, संगीतकार.
१९३६ : अखलाक मुहम्मद खान उर्फ कवी शहरयार ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू कवी (मृत्यू: १३ फेब्रुवारी २०१२)
१९५० : भारतीय अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म.
१९६८ : अरविंद केजरीवाल 'आम आदमी पार्टी'चे संस्थापक, समाजसेवक व सनदी अधिकारी
१९९४ : आर्या आंबेकर, प्रसिद्ध गायिका.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६९ : भारतीय-इंग्रजी वनस्पतीशास्त्रज्ञ व संशोधक चार्ल्स स्टर्ट यांचे निधन. (जन्म: २८ एप्रिल १७९५)
१९२५ : बंगालमधील विख्यात कायदेपंडित आणि स्वातंत्र्यसेनानी देशबंधू चित्तरंजन दास यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १८७०)
१९३० : गॅरोकोम्पास चे सहसंशोधक एल्मर ॲम्ब्रोज स्पीरी यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १८६०)
१९४४ : आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ, देशातील वैज्ञानिक चळवळीचे प्रणेते, त्यांनी 'बेंगॉल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स' ही कंपनी काढली. १८९६ मधे त्यांनी पारा आणि नायट्रोजन यांच्या संयोग करुन मर्क्युरस नायट्रेटची निर्मिती केली. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्रेटस' म्हणत असत. (जन्म: २ ऑगस्ट १८६१)
१९७१ : बीबीसी चे सह-संस्थापक जॉन रीथ यांचे निधन. (जन्म: २० जुलै १८८९)
१९७७ : श्रीपाद गोविंद नेवरेकर, मराठी रंगभुमीवरील लोकप्रिय गायक, नट.
१९९५ : शुद्धमती तथा 'माई' मंगेशकर मंगेशकरांच्या मातोश्री

# जाणून घ्या पेरू फळाची अधिक लाभ देणारी जात



लाल पेरूच्या लागवडीतून भरपूर पैसे कमावण्याची संधी आहे. तसेच एकदा का झाडे लावली कि पैसाच पैसा मिळतो असं म्हटलं जाते. परंतु यासाठी कष्ट, योग्य नियोजन, तज्ञांचा सल्ला अतिशय महत्वाचा ठरतो. आज आपण याबाबींबद्दल सविस्तर माहिती घेणार आहोत. पेरूच्या विविध जाती बाजारात उपलब्ध आहेत. यामध्ये देशी पेरूसोबत आता अनेक विकसित जातीही तयार करण्यात आल्या आहेत. सध्या तैवान अन लाल पेरूची लागवड करण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे. अधिक उत्पादन देणाऱ्या पेरूंच्या विविध जातीं :१. पिंक तैवाण पेरू. २. लखनवी पेरू. ३. बनारसी. ४. हरिझा. ५. लाल पेरू.

जपानी रेड डायमंड पेरू फायदेशीर :जपानी रेड डायमंड पेरूची लागवड देशात वाढली आहे. लाल डायमंड पेरूची शेती करून नफा कमवायचा असेल तर त्यासाठी योग्य तज्ज्ञांचे म्हणणे जाणून घेणे गरजेचे आहे. पेरू बगातूवन वर्षाला एकरी लाखो रुपयांची कमाई होऊ शकते. लाला पेरू लागवडीसाठी हे पहा :जपानी रेड डायमंड पेरूची लागवड करण्यास सध्या शेतकरी प्राधान्य देत आहेत. १० ते ४२ तापमानात लाल पेरूचे चांगले उत्पादन मिळू शकते. मात्र, तापमान थोडे कमी राहिले तरी शेतकऱ्यांनी काळजी करण्याची गरज नाही. तसेच लाल पेरूची झाडे काळ्या, वालुकामय चिकणमाती असलेल्या जमिनीत चांगली वाढते. यासाठी जमिनीचा पीएच ७ ते ८ असावा असे तज्ञ सांगतात.

इतक्या अंतरावर लावा झाडे :जपानी डायमंडची लागवड करताना दोन ओळीत ८ फूट अंतर ठेऊन रोपे लावावीत. तसेच एका ओळीतील दोन रोपांच्यामध्ये ६ फूट अंतर असावे. रोपाच्या योग्य वाढीसाठी वर्षातून दोनदा छाटणी करावी. जर फळ चिकूच्या आकाराचे झाले तर ते फोम पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवा. त्यामुळे पेरू चांगला शिजतो. तसेच फळे बांधून ठेवली तर त्याला डाग पडत नाहीत.

खत, सिंचनाची काळजी कशी घ्यावी :पेरूच्या झाडांची वाढ चांगली होण्यासाठी शेणखत वापरणे फायद्याचे ठरते. शेणखत, गांडूळ खात यांच्या वापराने जमिनीची सुपीकता वाढते. याशिवाय एनपीके सल्फर, कॅल्शियम नायट्रेट, मॅग्नेशियम सल्फेट, बोरॉन यांचा वापर रासायनिक खतांमध्ये करता येतो. झाडाला पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन वापरणे गरजेचे आहे. यामुळे पाण्याची बचत होतेच परंतु यासोबतच झाडाला पुरेसे पाणी नियमित देणे शक्य होते.

# महापुरुषांचे विचार कृतीत आणून यशस्वी व्हा

## श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर यांचे बीड येथील कार्यक्रमात प्रतिपादन

बीड। प्रतिनिधी

महापुरुषांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांना कृतीत आणून जीवनात यशस्वी व्हावे असे प्रतिपादन होळकर घराण्याचे वंशज श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर यांनी व्यक्त केले. येथील तुलसी शैक्षणिक समूह, बीड च्या वतीने शनिवार दि.१४ रोजी राजमाता अहिल्यामाता होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून बीड मागास बहुजन कल्याण मंडळाचे सहाय्यक संचालक मा. डी. बी. क्षिरसागर, महाराष्ट्र सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष मा. संदीपजी उपरे आणि गेवराई नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मा. विक्रम मांडूरके हे उपस्थित होते. यावेळी मा.सौ. दीपा रोडे, मा. इंजि. दीपंकर रोडे,





मा.सौ.मनिषा देवकते, मा.अंकुश निर्मळ, मा.प्रा.भगवान माने, मा.प्रा.भास्कर चादर, मा.प्रा.राम गायकवाड, मा.ॲड.राजू शिंदे, मा.प्रा. राजेंद्र गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पुढे भूषणसिंहराजे यांनी नमूद केलं की, अहिल्यामाता होळकरांच्या कार्याची तुलना फॉरेन लीडर्ससोबत होते. पण आपणच आपल्यावर गर्व केला पाहिजे. भारताने अनेक ऐतिहासिक यश संपादन केलेत, की ज्या यशांशी जगाची तुलना व्हायला हवी. यशवंतराव होळकरांनी इंग्रजांविरोधात लढताना अनेक देवस्थानांना आर्थिक मदतीची विनंती केली होती. काहींनी मदत नाकारल्यावर मल्हाररावांनी स्पष्ट सांगितले, देश जिंकल्यास धर्म टिकेल, देश हाच प्रथम असला पाहिजे. ही राष्ट्रनिष्ठा प्रत्येक भारतीयाच्या मनात असावी, असे त्यांनी आवर्जून सांगितले.भारतीय समाज परदेशी गोष्टींना आकर्षित होतो, परंतु भारतानेही इतिहासात मोठमोठी अचिव्हमेंट्स केलेल्या आहेत. होळकर, शिंदे, गायकवाड यांच्यासारखी साम्राज्ये सैन्यशक्ती आणि धोरणांमध्ये अत्यंत प्रबळ होती. होळकरांचे क्षेत्रफळ हे युनायटेड किंगडमपेक्षा मोठे होते आणि त्यांच्या धोरणांमध्ये त्या काळातील आधुनिकतेचे सारे गुण होते. यशवंतराव होळकरांनी इंग्रज अधिकाऱ्याला १८ वेळा भारतात पराभूत केले, हा इतिहास भारतीय युवकांनी जाणून घेण्यासारखा आहे.त्यांनी हेही स्पष्ट केलं की, बीड जिल्ह्याला विविध जाती-जमातींमधील तणावामुळे विशेष ओळख मिळाली आहे. पण हे चित्र बदलले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-पातीच्या मावळ्यांना सोबत घेऊन लढा दिला. आपल्यालाही अशाच प्रकारे सामाजिक एकतेसाठी पुढे यावं लागेल. आपण भारताला ''विश्वगुरू'' म्हणतो, पण केवळ घोषणांनी ते शक्य होणार नाही. त्यासाठी कृती करावी लागते आणि ती कृती प्रत्येक नागरिकामधून दिसली पाहिजे. इजराईलचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, छोटासा देश असूनही तिथला प्रत्येक नागरिक आपल्या देशासाठी लढायला तयार असतो. भारतातही असाच राष्ट्राभिमान निर्माण व्हावा, असा संदेश दिला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, प्रमुख पाहुणे मा. डी. बी. क्षिरसागर, मा. संदीपजी उपरे आणि मा. विक्रम मांडूरके यांनीही आपले मनोगत व्यक्त करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, सूत्रसंचालन डॉ. पांडुरंग सुतार तर आभार प्रा.अंकुश कोरडे यांनी मानले. या कार्यक्रमास संस्थेच्या सर्व विविध युनिटमधून आलेले प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रदीप मिश्रा यांना अंबाजोगाईत शिव कथेसाठी निमंत्रण

अंबाजोगाई। प्रतिनिधी

शिवपुराण कथाकर प्रदीप मिश्रा हे माऊली महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे सात दिवसीय शिवकथा करण्यासाठी आले होते.यावेळी मा नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी प्रदीप मिश्रा यांची भेट घेऊन अंबाजोगाईत शिवकथा घेण्याचे निमंत्रण दिले आसुन त्यांनी ही सकारात्मकता दर्शवली आहे.

चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत माऊली महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने चाकरवाडी येथे ८ते १४ जुन दरम्यान प्रदीप मिश्रा यांच्या शिव पुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. या शिवकथेसाठी राज्य व परराज्यातुन लाखोंचा जनसमुदाय व थोर संत विभूती, सामाजीक,राजकीय क्षेत्रातील मंडळी कथेसाठी चाकरवाडी येथे आले होते.यामध्ये काशीपीठ येथील मठाधिपती शंकराचार्य महाराज, जरांगे पाटील,खा. बजरंग सोनवने, मा.मंत्री धनंजय मुंडे,माजी



नगराध्यक्ष राजकिशोर मोदी,आ. नमिता मुंदडा,राजेसाहेब देशमुख, लाखो शिवप्रेमी तसेच ज्ञानेश्वर माऊली महाराजांचे अनुयायी कथेसाठी आले होते. शिवपुराण कथे दरम्यान मा. नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी प्रदीप मिश्रा यांची भेट घेऊन सांस्कृतिक शहर आसलेल्या अंबाजोगाई येथे शिवकथा घेण्यासाठी विनंती केली आहे. त्यांनी मोदी यांच्या विनंतीला माणदेऊन कथेसाठी येण्यास अनुकूलता दर्शवली आसल्याची माहिती राजकिशकिशोर मोदी यांनी दिली.

# माणुसकी जपत सामाजिक कार्यकर्त्यांकडून बेवारस मयत व्यक्तीवर अंत्यसंस्कार

## नातेवाईकांनी नाकारले, परळीच्या नितीन शिंदेंनी स्वीकारले

परळी। प्रतिनिधी

बालाजी सोळंके नामक बेवारस व्यक्ती हा मागील २० वर्षापासून परळी शहरातील नेहरू चौक (तळ) परिसरात राहत होता.रस्त्याच्या बाजूला मयत झाल्याचे आज सकाळी दिसून आले.नितीन शिंदे यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात व पालिकेस कळवले.मयत सोळंके यांची परभणी शहरात वासत्वास असलेली रक्तातील नात्याची सखी बहीण असल्याची माहिती मिळाली पोलिसांनी त्यांच्याशी संपर्क केला असता भाऊ आणि माझा मागील २० वर्षांपासून काहीही संबंध नाही आसे मयताच्या सख्या बहिणीकडुण निर्दयीपणे सांगीतले व त्यांच्या भावाचा अंत्यविधी करण्यास त्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला. त्यामुळे निर्माण झालेला पेच प्रसंग पाहता सामाजीक बांधिलकी व मृत्यु पश्चात होणारी मानवी देहाची अवहेलना होऊ नये या भावनेतुन परळी शहरातील सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या नितीन शिंदे, सेवकराम जाधव, शिवाजी देशमुख यांनी घटणेचे गांभिर्य पाहता परळी शहरातील समाजकार्यात एक पाऊल पुढे असणाऱ्या व्यक्ती आणि पोलीस प्रशासणाच्या सहकार्याने मयत बेवारस बालाजी सोळंके यांचा अंत्यसंस्कार करण्यासाठी पुढाकार घेतला.

त्यानुसार पोलीस प्रशासन,नगर पालिका प्रशासन आणि परळी शहरातील सामाजीक क्षेत्रातील मान्यवरांनी मिळून आज रोजी ५:३० वाजता परळीत सदरील बेवारस मयत व्यक्तीचा अंत्यविधी करण्याचा निर्णय घेतला या वेळी कर्तव्यावर आसलेल्या चरणसिंग वळवी (बीट हवलदार) पोलीस हेड कॉन्स्टेबल परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या समक्ष व अधिकृत सहमतीने सामाजीक कार्यकर्ते नितीन शिंदे, सेवकराम जाधव सर, शिवाजी देशमुख,वेगवान मराठीचे उपसंपादक पत्रकार केशवराव मुंडे आबासाहेब देशमुख, उत्तम मोरे यांच्यासह साजिद खान गुत्तेदार यांच्या दुकाना समोर रात्रीच्या वेळी सदरील मयत व्यक्ती आसऱ्याला झोपत आसे आणि त्यामुळे आपल्या दुकाणाचे संवक्षण होते याची जाण ठेऊण जाती धर्माचे बंधन तोडुण याप्रसंगी अंत्यविधी साठी लागणारे लाकडं (सरपन) दिले.तर बेकरी वाले माहेमूद खान, प्लम्बर नासिरभाई, अन्नू भाई व इतर बांधव देखील अंत्यविधीस उपस्थित होते. या वेळी उपस्थित शिवाजीराव देशमुख आणि केशवराव मुंडे यांच्या कडुण मयत बालाजी सोळंके यांच्या पार्थिवास पुष्पहार अर्पण करुण श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रतिष्ठित व सामाजिक क्षेत्राची जाण व आवड असलेल्या मोजक्याच मान्यवरांच्या उपस्थित परळी वैजनाथ येथील वैकुंठ धाम स्मशान भुमित मयत बालाजी सोळंके यांच्यावर हिंदु रिती रिवाजा प्रमाणे विधी व अंत्यसंस्कार करण्यात आला.

# भाग्यश्री सातपुते हिची निट परीक्षेत उत्तुंग भरारी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

तालुक्यातील येल्डा येथील भाग्यश्री बळीराम सातपुते हिने वैद्यकीय शिक्षणासाठी झालेल्या निट परीक्षेत ५०२ गुण मिळवून आपला वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश निश्चित केला आहे.येल्डा पंचक्रोशीसाठी हि आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.भाग्यश्री ही येल्डा पंचक्रोशीतील पहिली महिला एम.बी.बी.एस. होणार आहे.भाग्यश्रीच्या येशाबध्दल सामाजीक कार्यकर्ते व्यंकटेश चामनर व उषा व्यंकटेश चामनर यांच्या वतीने सन्मान करण्यात आला.त्रिंबक खोडवे, बळीराम सातपुते,उत्तरेश्वर सातपुते, भगवान सातपुते यांच्यासह ईतर नातेवाईक व आप्तेष्ट उपस्थित होते.



**पाटोदा : पाटोदा शहराला महासांगवी तलाव पाणी पुरवठा करण्यासाठी महत्वाचा आहे. आत्तापर्यंत झालेल्या पावसात तो ७० टक्के भरला असून लवकरच सांडव्यावरून पाणी पडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.**

# डीवायएफआयच्या तालुका अध्यक्षपदी जगन्नाथ पाटोळे तर सचिवपदी सचिन टिळक यांची निवड



अंबाजोगाई । प्रतिनिधी

डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) या युवक संघटनेचे तालुका अधिवेशन१३जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनास शहर व तालुक्यातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. या अधिवेशनात डीवायएफआयची नवीन तालुका कमिटी निवडली गेली. या नवीन तालुका कमिटीमध्ये डीवायएफआयच्या अध्यक्षपदी जगन्नाथ पाटोळे तर सचिवपदी सचिन टिळक यांची एकमताने निवड करण्यात आली. या अधिवेशनात नवीन १४ सदस्यांची तालुका कमिटी एकमताने निवड करण्यात आली. ही नवीन कमिटी डीवायएफआयचे जिल्हा उपाध्यक्ष सुहास चंदनशिव यांनी मांडली. व त्याला सर्व सदस्यांनी मान्यता दिली. देविदास जाधव यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सहसचिव म्हणून प्रशांत मस्के, आकाश कसबे तर कोषाध्यक्ष वैभव राजमाने यांची निवड करण्यात आली. आकाश सासणे, अनिल फुले, काझी साहब, राहुल भावठाणकर,बबलू सर्वदे, नरेश चव्हाण,रामदास घाडगे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.अधिवेशनाचे उद्घाटन डीवायएफआय संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख यांनी केले. तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड अजय बुरांडे यांनी नवीन तालुका कमिटीला सत्कार करून शुभेच्छा दिल्या. मागील कार्याचा आढावा प्रशांत मस्के यांनी मांडला. त्याचबरोबर येणाऱ्या काळामध्ये बेरोजगारी, जातीयवाद,धर्मांधता सह युवकांच्या समस्या बाबत सक्रिय होऊन आंदोलन उभे करण्याचे ठराव या अधिवेशनात घेण्यात आले.

# धारूरमध्ये १३६ जणांचे रक्तदानासह आजी-माजी सैनिकाचाही सत्कार

धारूर। प्रतिनिधी

धारूर येथील जागतिक रक्तदान शिबिर व कैलासवासी कॅ . राजपाल सिंह हजारी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराबरोबरच आजी-माजी सैनिकाचा सत्कार करण्यात आला .रक्तदान शिबिरात १३६ जणांनी रक्तदान केले .

धारूर येथे जागतीक रक्तदाता दिन व कै.कॅ.राजपालसिंह हजारी यांच्या २८ व्या पुण्यतिथी निमीत्त प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी शनिवारी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते तसेच आजी - माजी सैनिक यांचा सत्कार करण्यता आला. जम्मू कश्मीर येथील पहेलगाम येथे दहशतवाद्यानी भ्याड हल्ला केला होता, या ठिकानी २६ निष्पाप लोकाची हत्या केली होती . अहमदाबाद येथे विमान अपघातात २४२ जणाचा मृत्यू झाला होता . या सर्वांना श्रद्धांजलि अर्पण करण्यता आली . प्रस्ताविकमध्ये बालाघाट प्रतिष्ठान चे अध्यक्ष व नगर अध्यक्ष डॉ .स्वरुपसिंह हजारी यांनी बालाघाट प्रतिष्ठान विषयी कार्याची माहिती दिली . तसेच''ऑपेरेशन सिंदूर या विषई माहिती



दिली .अजी - माजी सैनिक यांचा सन्मान करण्यात आहे . आजी-माजी सैनिक, सिमा सुरक्षा दलाच्या सैनिकांचा बालाघाट प्रतिष्ठाच्या वतीने तिरंगी फेटा , ट्रॉफी देउन सत्कार केला . कै. कैप्टन राजपालसिंह हजारी यांच्या जून्या अठवाणी विषयी माहिती प्रास्ताविकामध्ये डॉ . स्वरुपसिंह हजारी यांनी माहिती दिली . कॅ . राजपालसिंह हजारी यांचा पुण्य तिथि निमित या पूर्वी रक्तदान शिबीर वृक्षारोपण शैक्षणिक साहित्य दिव्यांग बांधव यांना सायकल वाटप व करोना कालात किट वाटप या वर्षी अजी माजी सैनिक यांचा सत्कार , सम्मान अशा विविध कार्यक्रम विषयी माहिती दिली .प्रत्येक वर्षी नवीन उपक्रम राबवू आशी माहिती डॉ . स्वरुपसिंह हजारी यानी दिली .या वेळी माजी नगराध्यक्ष शेषराव फावड़े, पोलिस निरीक्षक देवीदास वाघमोडे , वन परिक्षेत्र अधिकारी ईश्वर गुणावत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोदकुमार तिवारी, उदयसिंह दिक्खत, लक्ष्मण सिरसट, उत्तमलाल तोष्णीवाल, हनुमंत नागरगोजे, दत्ताभाऊ शिनगारे , सुनील शिनगारे , नितिन भैया शिनगारे, बालासाहेब गायकवाड ,यशवंतराव गायके , दत्तात्रय गोरे ,बाबूभाई मिस्त्री , अतुल भैया शिनगारे , नाथाभाऊ ढगे, सिद्धेश्वर रदवे , राजू कोमटवार ,कृष्णा भावठानकर धोंडीराम सिरसट, लासाहेब चव्हाण , रोहित हजारी बालाजी चव्हान, बालासाहेब खामकर , रूपेश चिद्रवार संतोष सीरसट , माणिकराव लोखंडे , सुरेश लोकरे , बालासाहेब चोले , दत्ता भाऊ धोत्रे युवा मोर्चा तालुका अध्यक्ष गणेश बड़े भाजपा युवा मोर्चा ॲड मोहन भोसले , नदीम मोमिन, रोहनसिंह हजारी , रामप्रभु मुंडे ,अजयसिंह हजारी ,तुकाराम तिडके , नवनाथ पांचाल अंगद मुंडे ॲड साजेद सय्यद, सह तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड मोहन भोसले यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाघाट प्रतिष्ठानचे दीपक पटवर्धन, सचिन दुबे, संतोषसिंह पवार, एजाज भाई ,रूपेश चिद्रवार , ॲड मोहन भोसले,रवी शंकर कुभार सह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी यानी परिश्रम घेतले

# ५० टक्के पेरण्या पूर्ण, तरीही बी,बियाणे वाटप नाही-दत्ता वाकसे

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मान्सूनपूर्व आणि मान्सूनच्या पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली असून, आतापर्यंत जवळपास ५० टक्क्यांहून अधिक पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाइन नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रायोगिक तत्त्वावर मोफत बियाणे वाटप करण्याची योजना अजूनही कागदावरच आहे. अजूनपर्यंत बीड जिल्ह्यातील ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्याला मोफत बियाणे मिळालेले नाही, ज्यामुळे कृषी विभागाचा 'वरातीमागून घोडे' असा कारभार समोर आला आहे. दरवर्षी महाडीबीटीमार्फत लॉटरी पद्धतीने सोयाबीन, भुईमूग, उडीद मुग यांसारख्या पिकांचे बियाणे शेतकऱ्यांना मोफत दिले जाते. यासह इतर बी बियाण्याचे ऑनलाईन पद्धतीने अनेक शेतकरी या योजनेचा लाभ घेऊन आर्थिक सवलत



मिळवतात.परंतु यावर्षी, पेरण्या होऊनही बियाणे वाटपासाठी शेतकऱ्यांची निवड यादीच तयार झालेली नाही. पाऊस समाधानकारक झाल्याने शेतकऱ्यांनी वेळेवर पेरण्या सुरू केल्या आहेत. आता निम्म्याहून अधिक पेरण्या पूर्ण झाल्या असताना, निवड यादी कधी जाहीर होणार आणि बियाणे शेतकऱ्यांपर्यंत कधी पोहोचणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे. कृषी विभागाच्या या दिरंगाईमुळे गरीब शेतकऱ्यांना मोठा आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे. शासनाच्या या गलथान कारभारावर नाराजी व्यक्त करत मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे म्हणाले आहेत की संबंधित यंत्रणेवर तातडीने कारवाई करण्याची मागणी वाकसे यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने या गंभीर बाबीकडेत्वरित लक्ष देऊन मोफत बियाणे वाटप प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी मागणी मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केली आहे.

# मोदींची देशातील गरीबीचे पूर्णपणे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या ११ वर्षात सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या संकल्पनेनुसार राज्य कारभार होत असल्यामुळे प्रत्येक नागरिक याचा साक्षीदार ठरला आहे. भारताच्या विकासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत:कडे घेतले नसून १४० कोटी भारतीयांना याचे श्रेय दिले आहेत, असे सांगत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गरीबीचे पूर्णपणे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्यानुसार गरीब कल्याण अन्न योजना, उज्वला योजना, आवास योजना, जलजीवन मिशन, जनधन योजना, आयुष्मान भारत, किसान सन्मान निधी अशा अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या जात असल्याचे आ. संजय केनेकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**

११ वर्षात विकसित भारताचा अमृतकाल ठरला आहे. देशात सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११ वर्षे या संदर्भात माहिती देण्यासाठी रविवारी बीड येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटनीस प्रा. देविदास नागरगोजे, ज्येष्ठ नेते अशोक लोढा, नवनाथ शिराळे, चंद्रकांत फड, विक्रांत हजारी, सलीम जहाँगीर, दीपक ढाकणे आदी उपस्थित होते.

आ. केनेकर म्हणाले,गेल्या ११ वर्षात भारताने अमृत काळात विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. २०१४ पूर्वी सामान्य माणूस, अधिकारी हे




आ. संजय केनेकर यांची पत्रकार परिषदेतून माहिती

कसे शक्य आहे, हे शक्यच नाही, असे म्हणत असे. आता गेल्या ११ वर्षातील मोदी सरकारने केलेली कामे बघता, ‘‘होय, हे शक्य आहे, हे झालेच पाहिजे, मोदी सरकार असल्यामुळे हे नक्कीच होणार, असे सामान्य माणूस मोठ्या विश्वासाने म्हणून लागला आहे. मोदी सरकारने भारतीय राजकारणात कार्यक्षमतेचे राजकारण हा नवा शब्दप्रयोग प्रत्यक्षात आणला आहे. आपण जनतेला जबाबदार आहोत, हे लक्षात ठेऊन मोदी सरकारने कारभार केला आहे. सरकारी कारभारात पारदर्शकता आणून, वेगवेगळ्या सुधारणा करून मोदी सरकारने आपल्या नव्या संस्कृतिचा परिचय दिला आहे.

२०१४ पूर्वी देश भ्रष्टाचाराने पोखरला होता. देशात अनेक घोटाळे घडत होते. देशात लांगुलचालनाचे राजकारण सुरू होते. मोदी सरकारने मात्र देशात विकासाचे युग सुरू केले. २०१४ पूर्वी सरकारी योजनांचे लाभ लाभार्थी जनतेपर्यंत पोहचत नसत. लाभार्थी जनतेला हे लाभ मिळविण्यासाठी मध्यस्थांकडे जावे लागे, मोदी सरकारने डीबीटी प्रणालीचा वापर करत सामान्य माणसाच्या थेट बँक खात्यात लाभ पोहचवण्याचे काम केले आहे. २०१४ पूर्वी सामान्य माणसाला वैद्यकीय उपचारावर केल्या आणा-या खर्चाची भिती वाटत असे. मोदी सरकारने ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत उपलब्ध केले आहेत. पूर्वी आपल्याला अनेक वस्तूंची आयात करावी लागत असे, आता मात्र मेक इन इंडियामुळे अनेक वस्तू आणि सेवांची निर्यात करत आहोत. २०१४ पूर्वी आपली अर्थव्यवस्था दुर्बल म्हणून ओळखली जात होती. आता आपण जगात ５व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलो आहोत. ४ थ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे भारताची वाटचाल सुरू आहे.

## सुरूमगाव आठ दिवसांपासून अंधारात

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील सुरूमगांवात आठ दिवसांपासून अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे ग्रामस्थांचे हाल होत असून महावितरणचे अधिकारी अभियंता रोहन काळे व लाईमन महादेव कावळे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत.**

सुरूमगावात वीजपुरवठा करणारे रोहित्र जळून खाक झाले आहे. मागील आठ दिवसांपासून यामुळे अंधार पडला आहे. ऐन पावसाळा व गर्मीच्या दिवसात वीजेअभावी लहान मुलांचे व अबाल वृद्धांचे हाल होत आहेत.वीज नसल्याने ग्रामस्थांना पिण्याचे पाणी, मोबाईल चार्जिंग करताना अडथळा निर्माण झाला आहे. तसेच पिठाच्या गिरण्या बंद पडल्या आहेत.सरपंच व ग्रामस्थांनी वारंवार रोहित्र बसविण्याची मागणी करूनही महावितरणचे अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे सरपंच शिवकुमार माने यांनी सांगितले. कंपनीने तातडीने नवीन रोहित्र बसवावे व वीज पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी सरपंच शिवकुमार माने, उपसरपंच दादासाहेब माने,रंजीत जोगडे, बाळासाहेब खराडे, शेखर माने, दत्ता माने, पशुपती गुळभिले आदींच्या वतीने करण्यात आली आहे.

## राज वक्ते यांचा स्पर्धा परीक्षेतील यशाबद्दल प्रा. बापू घोक्षे यांनी केला सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय स्तरावरील बँकींग स्पर्धा परीक्षेत यश मिळवल्याबद्दल राज प्रकाश वक्ते यांचा सुप्रसिद्ध नाटककार प्रा. बापू घोक्षे यांनी सहपरिवार त्यांच्या निवासस्थानी जाऊन सत्कार केला.**

निवृत्त पोलीस अधिकारी श्री. प्रकाश वक्ते आणि सौ. सुनिता वक्ते या उच्च विद्याविभूषित दाम्पत्याचे सुपुत्र श्री. राज वक्ते यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या आयबीपीएस च्या राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेत यश मिळवले असून स्टेट बँक ऑफ इंडिया अंतर्गत ज्युनिअर असोसिएट या पदासाठी श्री. राज वक्ते यांची निवड झाली आहे. श्री. राज वक्ते हे कृषी



क्षेत्रातील पदवीधर असून बँकींग मध्ये करिअर करण्यासाठी त्यांनी आपल्या अथक परिश्रमाने हे यश प्राप्त केले आहे.

या यशाबद्दल सुप्रसिद्ध नाटककार प्रा. बापू घोक्षे यांनी आपल्या सुविद्य पत्नी सौ. विजया बापू आणि सुकन्या संहिता यांच्यासह श्री. राज वक्ते यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ तथा औक्षण करून आणि मिठाई भरवून श्री. राज वक्ते यांचा सत्कार केला. श्री. राज वक्ते हे प्रा. बापू घोक्षे यांचे भाचे आहेत. याप्रसंगी श्री. राज वक्ते यांच्या माता-पित्यांसह त्यांचे ज्येष्ठ बंधू बँक अधिकारी श्री. सुरज वक्ते आणि परिवारातील सदस्य उपस्थित होते. या यशाबद्दल श्री. राज वक्ते यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## चेअरमन विरेंद्र सोळंके ब्राझीलमध्ये ऊस पीक पाहणी व अभ्यास दौऱ्यासाठी रवाना

### मतदारसंघातील ऊस शेतीसाठी नवे क्षितिज - आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी आश्वासक ठरणाऱ्या ऊस पीकासाठी नवनवीन प्रयोग व आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. याच दृष्टीने, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके हे नॅशनल को-ऑप फेडरेशन दिल्ली यांच्या माध्यमातून ब्राझील येथे आयोजित ऊस पीक पाहणी व अभ्यास दौऱ्यासाठी रवाना झाल्याची माहिती आ.प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी आश्वासक ठरणाऱ्या ऊस पीकासाठी नवनवीन प्रयोग व आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. याच दृष्टीने, लोकनेते सुंदरराव सोळंके



सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके हे नॅशनल को-ऑप फेडरेशन दिल्ली यांच्या माध्यमातून ब्राझील येथे आयोजित ऊस पीक पाहणी व अभ्यास दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत. ब्राझीलसारख्या ऊस उत्पादनात आघाडीवर असलेल्या देशातील आधुनिक शेतीपद्धती,प्रक्रिया व तंत्रज्ञानाचा सखोल अभ्यास करून, मराठवाड्यातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळवून देणे हे या दौऱ्यामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.नवीन संधी, नवे तंत्रज्ञान याची जोड घालून शाश्वत ऊस शेतीकडे एक पाऊल पुढे टाकणे ही काळाची गरज असल्याचे आ.प्रकाश सोळंके यांनी सांगितले.

## राज ठाकरे यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा

### जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अन्नदान, केक आणि वृक्षारोपण

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस यंदा खास पद्धतीने साजरा करण्यात आला. बीडमधील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राज्याच्या उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने हा वाढदिवस अनाथ व बेघर नागरिकांसोबत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात अन्नदान करण्यात आले आणि गरजू नागरिकांना भरपेट जेवण दिले गेले. यानंतर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. राज ठाकरे यांच्या प्रतिमेसमोर केक कापून उपस्थितांमध्ये वाटप करण्यात आले आणि वाढदिवसाचा आनंद सर्वांसोबत सामायिक करण्यात



आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्षाताई जगदाळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात विविध उपक्रम राबवले. त्या या केंद्रातील बेघर, गरजू लोकांच्या मदतीस नेहमीच तत्पर असतात. वाढदिवसाच्या निमित्तानेही त्यांनी या परंपरेला पुढे नेत आपुलकीची भावना जोपासली. या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये बीड जिल्हाध्यक्षा आशाताई कुटे, जिल्हा उपाध्यक्षा कल्पनाताई कवठेकर, जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ बिडवे, बीड शहराध्यक्ष पठाण अमर जान, शास्त्री कुटे, अभिजीत वैद्य आणि काळजीवाहक छायाताई यांचा सहभाग होता.कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला आणि सामाजिक जाणिवेचा आदर्श घालून दिला.

## चतुर्थीनिमित्त श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे गायत्री यज्ञसंपन्न



बीड । प्रतिनिधी

गायत्री परिवार हरिद्वार शाखा बीड यांच्या वतीने काल दिनांक १४/५/२५ शनिवारी संकष्टी चतुर्थी निमित्तगायत्री यज्ञाचे आयोजन केले होते . यजमान सतीश काकासाहेब पोकळे व परीवार हे होते.

यावेळी गायत्री यज्ञामध्ये अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडिया विमान दुर्घटनेतील मृतांच्या आत्मा शांतीसाठी मंत्रोच्चार व त्यांच्या आत्म्यास शांती मिळण्यासाठी यज्ञामध्ये ५ आहुती देण्यात आल्या. यज्ञाचे पुरोहित म्हणून ह भ प मोहन महाराज खरमाटे ,रत्नपारखी महाराज व गायकवाड ताई यांनी केले.

या कार्यक्रमाला विशेष सहकार्य विलास लेंभें ,मुकुंद भूतपल्ले, मेहत्रे साहेब ,बोरा शेठ यांचे लाभले. या गायत्री परिवाराच्या यज्ञासाठी कौशल्य जाधव, जायभाय साहेब, निवृत्ती मुंडे, यादव शेठ वाघ साहेब ,विठ्ठल भराटे, चाटे साहेब ,नाना गिराम तसेच परदेशी काकू, पोकळे काकू ,लेंबे ताई ,मेहत्रे ताई, चाटे ताई यादव ताई ,वाघ मॅडम यांच्याच गणेश भक्त व गायत्री परिवार चे, यशवंत नगर मधील भाविक भक्त उपस्थित होते.

## डाहाळेवाडी येथील महिला आत्महत्या प्रकरणात आरोपी संतोष जगदाळे व देवळाबाई जगदाळे यांना अटकपूर्व जामीन मंजूर

पाटोदा । प्रतिनिधी

डाहाळेवाडी तालुका पाटोदा येथे विवाहिता आत्महत्या प्रकरणी पाटोदा पोलीस स्टेशनला गुन्हा क्रमांक १०८/२५ कलम १०८,३(५) भारतीय न्याय संहिता जाचजुलूम करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून पत्ती संतोष बळीराम ,सासू देवळाबाई बळीराम जगदाळे व सासरे बळीराम जगदाळे यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरील प्रकरणात आरोपी पत्ती व सासू यांचे अटकपूर्व जमानत बीड जिल्हा सेशन कोर्टाने फेटाळल्यानंतर आरोपीने माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अटकपूर्व जामीन अर्ज क्रमांक ७५८/२०२५ ॲड. एन.एल.जाधव यांच्यामार्फत दाखल केला होता. सदरील प्रकरणाची सुनावणी सुट्टीतील न्यायमूर्ती संजय ए. देशमुख यांच्यापुढे



दिनांक ०६.०६.२०२५ रोजी झाली असता सदरील प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. एन.एल.जाधव यांनी मयत व्यक्तीस आत्महत्या करण्यासंधर्भात कुठलाही थेट पुरावा नाही तसेच जे आरोप केलेले आहेत त्या आरोपाचे व जबाबचे अवलोकन केले असता आत्महतेस प्रवृत्त केले याबाबतचा सबळ पुरावा नसल्यामुळे तसेच गुन्हा नोंदविन्यासाठी झालेला उशीर घटना घडल्यानंतर आरोपी यांचे नैसर्गिक वर्तवणुकीचा विचार केल्यास आरोपीवर खोटा गुन्हा दाखल केला आहे असे सत्कृत दर्शनी दिसते. असे न्यायमूर्ती यांच्या निदर्शनास आणून दिले माननीय उच्च न्यायालयाने आरोपीचे वकील व शासनाचे वकील यांची बाजू ऐकूण सदरील प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकन केले असता सदरील प्रकरणात आत्महत्तेस प्रवृत्त केल्याचा सबळ पुरावा दिसत नसल्याचे नमूद करून आरोपींना अटक पूर्व जामीन मंजूर केले.

अर्जदारांच्या वतीने ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी काम पहिले तर त्यांना ॲड. राकेश ब्राम्हणकर ॲड. सोनाली गणेश सोमवंशी यांनी सहकार्यकेले तर शासनाच्या वतीने ॲड. एस. बी. जाधव यांनी काम पहिले.

# अमृत जल योजनेची सखोल चौकशी करा, बीड शहर बचाव मंचाची जनतेच्या वतीने मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहर बचाव मंचाच्या टीमने नुकतीच बीड शहरातील बऱ्याच भागांमध्ये अमृत जल योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या विस्तारीत पाण्याच्या टाक्या व पाणीपुरवठा नळ योजनेची पाहणी केली. बऱ्याच कालावधीपासून इन्फ्रास्ट्रक्चर पूर्ण तयार झालेले असून सुद्धा अमृत जल योजना कार्यान्वित का केली जात नाही?**

हा बीड च्या जनतेपुढे पडलेला फार मोठा प्रश्न आहे. केंद्र शासनाकडून शेकडो कोटी रुपये या योजनेसाठी पुरविण्यात आले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगरपालिका प्रशासन अशा संयुक्त पद्धतीने ही योजना राबविण्यात आली. नगरपालिकेकडून योजना हस्तांतरित करून घेऊन मोठ्या थाटामाटात त्या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या विस्तारीत पाण्याच्या टाक्यांचे उद्घाटन सोहळे करण्यात येऊन लोकार्पण करण्यात

**✻ पालकमंत्र्यांनी या प्रकरणांमध्ये तात्काळ लक्ष घालण्याची गरज आहे. या योजनांची सखोल चौकशी करण्यात यावी ✻ भुयारी गटार योजनेचे काय झाले? त्यासाठी मिळालेला शेकडो कोटी रुपये निधी कुठे गेला?**
**✻ कालबाह्य झालेल्या व सर्वदृष्टीने धोक्याच्या असलेल्या पाण्याच्या टाक्यांमार्फतच आजही बीड शहराला पाणीपुरवठा होत आहे. कालबाह्य झालेल्या व अनुषंगाने धोक्याच्या झालेल्या पाण्याच्या टाक्या कधी बंद करणार? ✻ विस्तारित पाण्याच्या टाक्या बांधूनही बराच काळ उपयोगात नसल्यामुळे अजूनही उपयोगशील आहेत का ? याची तपासणी करण्यात यावी ✻ शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा घरोघरी नियमितपणे कधी होणार..?**

आले. हजारो हजारो घरांना निळ्या पाईपचे कनेक्शन्स देण्यात आले. पाणी पुरवठ्याचे ट्रायल्स देण्यात आले. या योजनेतून दिलेले नळ घरोघर आज निकामी पडून आहेत. अशाप्रकारे एका मोठ्या जलपुरवठा योजनेचे वाटोळे जर बारामती मध्ये किंवा पुणे जिल्ह्यामध्ये झाले



असते तर माननीय पालकमंत्री अजित दादा आपण हे असेच सहन केले असते का? असा प्रश्न बीड शहरातील जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंच आपल्यासमोर मांडत आहे. अमृत जल योजना शेकडो कोटी रुपये खर्च करून देखील अयशस्वी झाली . केंद्र शासनाच्या शेकडो कोटी



रुपयांचा नासाडा करण्यात आला. फार मोठा भ्रष्टाचार या योजनेत झाला आहे,याची शक्यता नाकारताच येत नाही. ही योजना योग्य पद्धतीने प्रामाणिकपणे राबवण्यात आली असती तर बीडच्या जनतेचा




पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचा प्रश्न कधीच सुटला असता व बीडकरांना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागले नसते. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याची होणारी भीषण टंचाई थांबवण्यात यश आले असते आणि बीडच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला असता यात काहीच शंकाच नाही.

अशाच प्रकारे भुयारी गटार योजनेसाठी देखील मोठ्या प्रमाणामध्ये शासनाकडून निधी आलेला होता. भुयारी गटार योजना कुठ आहे? त्यासाठी मिळालेला निधी कुठे गेला? भुयारी गटार योजनेच्या अंतर्गत फिल्टर प्लांट उभा करण्यासाठी जमीन घेतली होती व फिल्टर प्लांट उभा करण्यात येणार होता . कुठे आहे तो फिल्टर प्लांट ? त्या फिल्टर प्लांट चे व त्यासाठी खरेदी केलेल्या जमिनीचे काय झाले ? भुयारी गटार योजना कोणी व कशी जिरवली ? याची जवाबदारी कोणावर आहे?

या योजना विकासाच्या कुठल्या टप्प्यावर आहेत, कधीपासून कार्यान्वित होतील, शासनाने जनतेसाठी शेकडो कोटी रुपये खर्च केल्यानंतरही या योजना बारगळत पडल्या आहेत याचा लाभ जनतेला कधीपासून मिळणार याचा खुलासा प्रशासनाकडून व संबंधित नेत्या पुढार्यांकडून तात्काळ करण्यात यावा ही मागणी जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंचा कडून करण्यात येत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.१६ जुन २०२५ । पान ७

# विश्वास आणि आत्मविश्वास यशस्वी वकिलीचा मूलमंत्र - न्यायमूर्ती जाधव

पुणे - 'कायद्यावरील विश्वास आणि आपल्या अभ्यासातून प्राप्त झालेला आत्मविश्वास हा यशस्वी वकिली व्यवसायाचा मूलमंत्र आहे,' असे विचार मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी (दि १४ जून) अशोका हॉल, जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे येथे व्यक्त केले.

दर्द से हमदर्द तक ट्रस्ट आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पाठ्यपुस्तकापलीकडील गुन्हेगारी कायद्याचे अनुभव आणि कायदेविषयक साहाय्य' या विषयावरील मासिक प्रशिक्षण उपक्रमाच्या समारोप सोहळ्यात मिलिंद जाधव बोलत होते.




पुणे जिल्हा न्यायालयातील मुख्य न्यायाधीश महेंद्र महाजन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव ड. सोनल पाटील, दर्द से हमदर्द तक ट्रस्टचे सचिव ड. प्रकाश साळशिंगीकर, ज्येष्ठ विधिज्ञ ड. सतिश गोरडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. मिलिंद जाधव पुढे म्हणाले की, 'कायदेविषयक कार्याची प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण घेणारी विधी विद्यार्थ्यांची ही पिढी अतिशय नशीबवान आहे, असे मला वाटते; कारण पदवी प्राप्त केल्यानंतर प्रत्यक्ष काम करताना अनंत अडचणी येतात. वकिली व्यवसायातून पैसे कमाविण्यात काहीच गैर नाही; पण त्याचबरोबर वकिलांनी सामाजिक अन् नैतिक भान ठेवणे खूप गरजेचे आहे. उत्तम वकील होण्यासाठी कठोर परिश्रमाला पर्याय नाही. स्वाभिमान, चिकाटी आणि सहनशक्ती, अद्ययावत व्यक्तिमत्त्व, वक्तशीरपणा, विनम्रता, विनोदबुद्धी या गुणांच्या साहाय्याने वकिली व्यवसायात उत्तुंग यश मिळवता येते. त्यादृष्टीने दर्द से हमदर्द तक ट्रस्टचे हे प्रशिक्षण अतिशय उपयुक्त आहे.'

महेंद्र महाजन यांनी, 'विधी महाविद्यालयातील पाठ्यपुस्तकातून जे ज्ञान मिळते ते समाजातील विविध क्षेत्रांत कायदेविषयक काम करताना पुरेसे नसते. ती कमतरता अशा उपक्रमातून दूर करण्याचा ट्रस्टचा प्रयत्न स्तुत्य आहे. पुणे जिल्ह्यात सुमारे सात लाख पंचेचाळीस हजार खटले प्रलंबित आहेत. त्यामुळे न्यायालयात मोठा जनसमुदाय न्यायाच्या प्रतीक्षेत आढळून येतो. अशा प्रशिक्षण उपक्रमांमुळे सक्षम वकिलांची उपलब्धता वाढेल, असा विश्वास वाटतो,' असे मत मांडले.

सोनल पाटील यांनी, 'जिल्हा विधी प्राधिकरणाने विधी विद्यार्थ्यांसाठी अनुभवातून न्यायदानाची भूमिका स्पष्ट व्हावी म्हणून दर्द से हमदर्द तक ट्रस्टच्या साहाय्याने एक महिन्याच्या कालावधीचा हा उपक्रम विधी विद्यार्थ्यांसाठी राबविला. त्यामुळे सर्व शस्त्र - अस्त्रांसह कुरुक्षेत्रावर युद्धासाठी सिद्ध झालेल्या अर्जुनासारखेच हे प्रशिक्षित वकील आपली कायदेविषयक लढाई सक्षमपणे लढतील,' असा विश्वास व्यक्त केला.

ॲड. प्रकाश साळशिंगीकर यांनी प्रास्ताविकातून, 'दर्द से हमदर्द तक ट्रस्टच्या कार्याची सुरुवात मुंबईपासून झाली असून महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी ट्रस्टच्या माध्यमातून दिग्गज विधिज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, गरीब अन् गरजू व्यक्तींना विनामूल्य समुपदेशन तसेच कायदेविषयक साहाय्य करण्यात येते. आतापर्यंत केवळ वकील मिळू न शकल्याने तुरुंगात खितपत पडलेल्या सुमारे ६००हून अधिक व्यक्तींना तुरुंगाबाहेर काढण्यात ट्रस्टला यश मिळाले आहे,' अशी माहिती दिली.दीपप्रज्वलन, भारतमाता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. दर्द से हमदर्द तक ट्रस्टने राबवलेल्या विधी विद्यार्थी प्रशिक्षण उपक्रमाची चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली; तसेच उपक्रमाच्या अहवालाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या उपक्रमात सहभागी झालेल्या विविध विधी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.दर्द से हमदर्द तक ट्रस्टच्या कार्यकारी अधिकारी ॲड. सुनीता साळशिंगीकर, ॲड सचिन शिंदे, ॲड खेताराम सोळंकी, ॲड संकेत राव, ॲड सोहम यादव, ॲड महेश सोनवणे, ॲड हिमांशू माने यांनी संयोजनात परिश्रम घेतले. ॲड. सतिश गोरडे यांनी आभार मानले. ॲड. गणेश नागरगोजे यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



# शिरूरमध्ये पोलिसांची कारवाई, पाच चोरलेल्या दुचाकींसह चोरटा गजाआड

शिरूर : शिरूर शहर व परिसरातून दूचाकी चोरींचे प्रमाण वाढल्याच्या पार्श्वभूमीवर शिरूर पोलिस ठाण्याच्या तपास पथकाने सापळा लावून एका दूचाकीचोराला पकडले. त्याच्याकडून पाच दूचाकी जप्त करण्यात आल्या असून, इतर चोऱ्यांतील काही मुद्देमालही पोलिसांनी हस्तगत केला आहे.

आर्यन एअरपोस पवार (रा. पाण्याच्या टाकीजवळ, शिरूर, मूळ रा. शिंदेवाडी, अष्टापूर, ता. हवेली. जि. पुणे) असे अटक केलेल्या दूचाकीचोराचे नाव असून, रोहित भोसले (रा. पाण्याच्या टाकीजवळ, शिरूर) या साथीदाराच्या मदतीने दूचाकी चोरीचे गुन्हे केले असल्याची कबूली त्याने दिली असल्याची माहिती पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली. गेल्या काही दिवसांत शिरूर शहर व परिसरात दूचाकी चोरीचे प्रमाण वाढले होते. त्यातच भूरट्या चोऱ्याही वाढल्या होत्या. गेल्या महिन्यात एका बांधकाम चालू असलेल्या इमारतीच्या आवारातील सुमारे ६५ हजार रूपये किंमतीचे बांधकामाचे लोखंडी साहित्य चोरीला गेल्यानंतर शिरूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चोरट्यावर पाळत ठेवली होती. शिरूर पोलिस ठाण्याच्या तपास पथकाचे प्रमुख पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांनी पोलिस हवालदार नाथसाहेब जगताप, नीतेश थोरात, विजय शिंदे, अजय पाटील, रवींद्र आव्हाड, निखिल रावडे, अक्षय कळमकर, सचिन भोई, रवी काळे, अजय पाटील, नीरज पिसाळ या पथकासह बांधकाम साहित्य चोरी आणि दूचाकी चोरांवर लक्ष्य केंद्रीत केले.त्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फूटेज आणि तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेतला. त्यातून आर्यन पवार व रोहित भोसले यांनीच हे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाल्यावर पोलिस पथकाने पवार याला त्याच्या घराच्या परिसरातच सापळा लावून पकडले. चोरून आणलेल्या पाच दूचाकीही पोलिसांनी त्याच्या घरातून जप्त केल्या.

# दोन दिवसांत कामे करा, अन्यथा दहा कोटी दंड भरा - उपमुख्यमंत्री पवार


पुणे : नुकत्याच झालेल्या पावसात हिंजवडी आयटी पार्कचे वॉटर पार्क झाल्याच्या घटनेची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी गंभीर दखल घेतली. हिंजवडीत पाणी साठणाऱ्या ठिकाणी पाण्याचा निचरा करण्यासाठी दोन दिवसांत कामे करा, नाहीतर दहा कोटींचा दंड भरा, असा सज्जड दम पवार यांनी टाटा मेट्रो कंपनीला भरला आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे काम टाटा कंपनी करत आहे.

मेट्रोच्या कामामुळे हिंजवडीतील अनेक रस्त्यांवर पावसाच्या पाण्याला अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे, थोड्याशा पावसाने रस्त्यावर पाणी साचून मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. नागरिकांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वीच्या घटनेमुळे हिंजवडी आयटी पार्क नाहीतर वॉटरपार्क झाले असून याला राज्यशासन जबाबदार असल्याची खोचक टीका विरोधीपक्षांकडून केली जात आहे. ही बाब सरकारच्या जिव्हारी लागली आहे. मेट्रोचे काम करताना पावसाळी नाले बुजविणे, पाण्याला वाट करून देण्यासाठी सुविधा नसणे यामुळे थोडया पावसात रस्त्यावर पाण्याची तळी साचत आहेत. याबाबीकडे दुर्लक्ष झाल्याबद्दल अजित पवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. शनिवारी पुण्यात उपमुख्यमंत्री पवार यांनी पालखी सोहळयाच्या नियोजनासाठी आढावा बैठक घेतली. या बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

पवार म्हणाले की, हिंजवडीत पाणी तुंबण्याच्या प्रकाराची माहिती पीएमआरडीए तसेच टाटा मेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून घेतली आहे. या प्रकरणी मेट्रोने पाण्याला वाट करून देण्यासाठी तातडीनं काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शनिवारी, रविवारी या रस्त्यावर वर्दळ कमी असल्याने या दोन दिवसात काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच सोमवार पर्यंत काम न केल्यास दहा कोटींचा दंड कंपनीला आकरण्याच्या सूचना दिल्या आहेत. कंपनीने काम करताना अशा गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. मात्र, दुर्लक्ष झाल्यास आर्थिक दंडाचा बडगा उगारावा लागेल. असे झाले तर पुन्हा असे प्रकार घडणार नाहीत.

# शिरूरमध्ये भंगार घोटाळा आणि अतिक्रमणप्रकरणी चौकशीचे आदेश

शिरूर : नगर परिषदेच्या सुमारे तीस ते चाळीस लाख रूपये किंमतीच्या भंगाराची परस्पर विल्हेवाट, फूटपाथ व पूररेषेतील अतिक्रमणे, घनकचरा व्यवस्थापन शास्त्रोक्त पद्धतीने होत नसल्याच्या तक्रारींसह विविध प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने नगर परिषद प्रशासनाने येत्या १५ दिवसांत बैठक घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा सहआयुक्त (नगर पालिका प्रशासन) व्यंकटेश दुर्वास यांनी शिरूर नगर परिषदेस दिले असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्मान सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबूब सय्यद व शिरूर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली.



भंगार साहित्याची चोरी, अतिक्रमणे, नगर परिषदेतून वीजचोरी, भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरण मोहिमेतील घोटाळा, अनधिकृत मोबाईल टॉवर, बेकायदा पार्कींग आदी विषयांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सय्यद दहा जूनपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तक्रारींची दखल घेतली गेल्याने त्यांनी शुक्रवारी (ता. १३) चौथ्या दिवशी उपोषण सोडले. आंदोलनातून मार्गी लागलेल्या विषयाची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. आम्ही शिरूरकर फाऊंडेशनचे अध्यक्ष रवींद्र बापू सानप, मनसेचे तालुका संघटक अविनाश घोगरे, शहर अध्यक्ष ड. आदित्य मैड, शहर संघटक रवीराज लेंडे, अण्णा दौंडकर, राजेंद्र महाजन, रामभाऊ इंगळे, गणेश जगताप आदी यावेळी उपस्थित होते.

नगर परिषदेतीलच एका अधिकाऱ्याने काही लोकांना हाताशी धरून लाखो रूपयांच्या भंगार साहित्याची परस्पर विल्हेवाट लावली असल्याच्या आमच्या तक्रारीची दखल घेत तक्रारीच्या अनुषंगाने येत्या १५ दिवसांत बैठक घेऊन कागदपत्रे व पुरावे तपासून पुढील उचित कार्यवाहीचे आश्वासन नगर परिषदेने दिले असल्याचे सय्यद यांनी सांगितले. याप्रकरणी नगर परिषदेचे स्वच्छता निरीक्षक डी. टी. बर्गे यांना सोमवार (ता. १६) पासून सक्तीच्या रजेवर पाठविले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे, असे ते म्हणाले. शहरातील पदपथावरील, पूररेषेतील अतिक्रमणे हटविण्याच्या मागणीबाबत नगर परिषदेने सकारात्मकता दर्शविली असून, अतिक्रमणधारकांसह नैसर्गिक नाल्यांवरील अनधिकृत बांधकाम धारकांना नोटीसा बजावल्या असल्याचे व पोलिस बंदोबस्तासाठी पत्रव्यवहार केला असून, बंदोबस्त मिळताच अतिक्रमणे काढली जातील, असे आश्वासन दिले असल्याची माहिती बांडे यांनी दिली. घनकचरा प्रक्रिया शास्त्रोक्त पद्धतीने न करता चुकीची बीले काढल्याच्या आमच्या तक्रारीचीही नगर परिषदेने दखल घेतली आहे.

ज्या ठेकेदाराला हे काम दिले आहे त्यासोबतच्या अटी व शर्तींची तपासणी करून दंडात्मक कार्यवाही केली जाणार आहे. बेकायदा पार्किंगबाबतची पोलिसांच्या मदतीने कार्यवाही, अनधिकृत मोबाईल टॉवर धारकांना नोटीसा, जीओ टॉवरकडून दुप्पट कर आकारणी, सांडपाणी व मलनिस्सारण प्रकल्प दुरूस्ती व नवीन मशिनरी, शहरातील रस्त्यांच्या कामांची चौकशी करून कार्यवाहीचे आश्वासन दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

# फुरसुंगी नगरपरिषदेवर ग्रामस्थांचा निषेध मोर्चा; कार्यालयाला टाळे ठोकून अधिकारी-कर्मचारी गायब

फुरसुंगी: संकेत विहार, पॉवर हाऊस (फुरसुंगी) परिसरातील नागरिकांनी नागरी समस्यांसंदर्भात शनिवारी (दि.१४) सकाळी फुरसुंगी नगरपरिषद कार्यालयावर मोर्चा काढला. मात्र, या ठिकाणी प्रशासक व कर्मचारी नसल्याने संतप्त महिलांनी गेटवर बांगड्यांचा आहेर करून निषेध व्यक्त केला.फुरसुंगीतील संकेत विहार, पॉवरहाऊस या परिसरातील नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर येथील रहिवाशांनी मार्च महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेल्या मोर्चाप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून फुरसुंगी, उरुळी नगरपरिषदेच्या प्रशासकांना या रहिवाशांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत निर्देश दिले होते.

मात्र, याबाबत कोणतेच समाधानकारक काम न झाल्याने येथील रहिवाशांनी स्वयंभू फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष हरपळे यांच्या नेतृत्वाखाली फुरसुंगी नगरपरिषदेवर निषेध मोर्चा काढला. मात्र, या वेळी नगरपरिषद कार्यालयाला टाळे असल्याचे पाहून आंदोलक संतप्त झाले.





त्यांनी प्रशासकाच्या विरोधात घोषणा देऊन कार्यालयाच्या गेटवर बांगड्यांचा आहेर करत, बॅनर झळकावत प्रशासकांविरोधात तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. या वेळी पॉवर हाऊस, संकेतविहार तसेच फुरसुंगी परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिसरात पाण्याची परिस्थिती गंभीर आहे. १८ ते २० दिवसांनंतर याठिकाणी पाणी येते. या परिसरात ड्रेनेज लाईन फुटल्या आहेत. कचरा वेळच्या वेळी न उचलल्याने याठिकाणी ढीग साठले आहेत. रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली असून रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ते हेच समजायला मार्ग नाही. परिसरातील विजेच्या तारा खराब झाल्याने अपघातांचा धोका संभवत आहे. कचरा डेपोलगतच हा परिसर असल्याने पावसाळ्यात अनेक साथीचे आजार परिसरात पसरत असतात. यामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे.

# पुण्यातील केईएम रुग्णालयाला बॉम्बस्फोटाची धमकी

**पुणे। प्रतिनिधी**

शहरातील प्रसिद्ध केईएम रुग्णालयाला ईमेलद्वारे बॉम्बस्फोटाची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली. ही माहिती मिळताच रुग्णालय प्रशासनाने तत्काळ पोलिसांना कळवले. त्यानंतर बॉम्ब शोध व निकामी पथक तसेच सायबर पथक घटनास्थळी दाखल झाले आणि संपूर्ण इमारतीची कसून तपासणी करण्यात आली.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बीडीडीएस पथकाने रुग्णालयाच्या परिसरात सखोल झडती घेतली. मात्र, कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा स्फोटक पदार्थ आढळले नाहीत. त्यामुळे काही वेळासाठी निर्माण झालेला तणाव निवळला असून, रुग्णालयाची कार्यवाही पूर्ववत सुरू आहे. रुग्ण अथवा कर्मचारी यांना बाहेर काढण्यात आले नसले तरी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली होती.दरम्यान, शहरातील दुसऱ्या एका रुग्णालयालाही अशाच स्वरुपाची धमकी ईमेलद्वारे प्राप्त झाली होती. परंतु तेथेही कोणतीही संशयास्पद बाब आढळली नाही. सध्या सायबर क्राईम विभाग या ईमेलच्या मूळ स्रोताचा शोध घेत असून, धमकी देणाऱ्याची ओळख पटवण्यासाठी तपास सुरु आहे.



पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील एक प्रसिद्ध रुग्णालय आणि बाणेरमधील खासगी हॉस्पिटलला बॉम्ब ठेवल्याची धमकी असलेला ईमेल आल्यानंतर खळबळ उडाली. हा प्रकार रविवारी रात्री साडे दहाच्या सुमारास उघडकीस आला. रुग्णालय प्रशासनाने तत्काळ पोलिसांना कळविल्यानंतर समर्थ आणि बाणेर पोलीस ठाण्यांनी घटनास्थळी धाव घेतली.घटनेचे गांभीर्य लक्षात घेता बॉम्ब शोधक व नाशक पथक (इऊऊड) आणि डॉग स्कॉड घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही हॉस्पिटल्सची कसून तपासणी करण्यात आली. मात्र, तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही.

या पार्श्वभूमीवर, खबरदारी म्हणून काही काळ संबंधित रुग्णालयांमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली होती. तपासणीनंतर ईमेल फेक असल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा मेल नेमका कोणी आणि कुठून पाठवला याचा शोध सुरू आहे.दरम्यान, या प्रकारामुळे रुग्णालय प्रशासन आणि नागरिकांमध्ये काही काळ अस्वस्थता निर्माण झाली होती. मात्र, पोलिसांच्या तत्काळ कारवाईमुळे परिस्थिती नियंत्रणात आली. पोलिसांकडून सायबर क्राइम विभागाच्या सहाय्याने तपास सुरू आहे.

# बाप बनला हैवान! पोटच्या १४ वर्षीय मुलीवर बलात्कार

शिरूर । प्रतिनिधी

रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथे तुळजापूरहून उदरनिर्वाहासाठी आलेल्या ४० वर्षीय नराधम बापाने स्वतःच्या १४ वर्षीय मुलीवर बलात्कार केला. त्यानंतर ही गोष्ट कोणाला सांगू नये, यासाठी त्या नराधमाने पत्नी आणि मुलीला जिवे मारण्याची धमकी देखील दिल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुळजापूरहून एक ४० वर्षीय व्यक्ती त्याची पत्नी व मुलीसह रांजणगाव औद्योगिक वसाहतीत कामानिमित्त आला होता. काही दिवसांपूर्वी पत्नी कामानिमित्त बाहेर गेलेली असताना त्या नराधमाने स्वत:च्याच मुलीवर लैंगिक अत्याचार केला.

मुलीने घडलेला प्रकार आईला सांगितला, परंतु नराधम आरोपीने हा प्रकार जर कोणाला सांगितला तर दोघींनाही जिवे मारून टाकील, अशी धमकी दिली. परंतु आईने धाडस करून रांजणगाव पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली.

त्यानंतर पोलिसांनी तातडीने त्या नराधमाला अटक केली. त्याला शिरूर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शिवाजी मुंढे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# पुण्यातील सराईत गुंडाचा सोलापुरात खात्मा; पुणे पोलिसात अनेक गुन्हे दाखल, गुन्हे शाखेची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

**एखाद्या हिंदी चित्रपटाच्या कथानकात ज्याप्रमाणे पोलिसांची टीम एखाद्या गुन्हेगाराचा एन्काऊंटर करते. अगदी तशाच पद्धतीने मोहोळ तालुक्यातील लांबोटी गावात गेल्या तीन महिन्यांपासून मोक्का सह इतर अनेक गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या शाहरुख उर्फ अट्टी रहीम शेख या गुन्हेगाराचा पुणे शहर गुन्हे शाखेच्या पथकाने एन्काऊंटर केला. शाहरुखला पोलीस ताब्यात घेत असताना त्याने गावठी पिस्तलने पोलिसांच्या दिशेने फायर केली. पोलिसांनी स्वरक्षणासाठी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाला. ही घटना आज (दि. १५) पहाटे साडेतीन वाजण्याच्या दरम्यान घडली.**

दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या शाहरुख उर्फ अट्टीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या पथकाने खालच्या मजल्यावर असलेल्या एका महिलेला शाहरुखचा फोटो दाखवला. तो इथेच राहतो का? असे विचारले, असता तिने वरच्या मजल्याकडे बोट दाखवत लहान खोलीत राहत असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी या महिलेला घेऊनच वरचा मजला गाठला. त्या छोट्या खोलीत शाहरुख त्याच्या पत्नीसोबत राहत होता. पोलिसांनी वर जाताच घराचा दरवाजा वाजवला. मात्र, आतून काही प्रतिसाद मिळाला नाही. काही वेळाने आतून त्याच्या बायकोने कोण आहे? असे विचारले. त्यानंतर पोलिसांसोबत-असलेल्या त्या महिलेने मी असल्याचे सांगत दरवाजा उघडण्यास सांगितले.

त्यानंतर शाहरुखच्या पत्नीने दरवाजा उघडला. दरवाजा उघडताच पोलिस आत घुसले. पोलीस आल्याचे पाहताच शाहरुखने गावठी पिस्टल पोलिसांवर ताणले . शाहरुखने जवळ झोपलेल्या लहान मुलाला ढाल बनवण्याचा प्रयत्न करत पोलिसांच्या दिशेने गोळी झाडली. त्यानंतर मात्र, पोलिसांनी लहान मुलाचा बचाव करत शाहरुखच्या दिशेने गोळी झाडली. ती गोळी थेट शाहरुखच्या पायाला लागली. मात्र तरीसुद्धा शाहरुखने त्याच्याजवळची गावठी पिस्टल पोलिसांच्या दिशेने रोखली होती. त्यानंतर मात्र पोलिसांनी पुन्हा गोळ्या झाडल्या आणि शाहरुख जखमी झाला.






तातडीने त्याला सोलापुरातील रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. दरम्यान शाहरुखला नेमक्या किती गोळ्या लागल्या याची माहिती अद्याप समोर आली नाही. शवविच्छेदनाच्या अहवालानंतरच त्याला नेमक्या किती गोळ्या लागल्या याचा तपशील समोर येईल.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शाहरुख उर्फ अट्टी रहीम शेख (वय २३, रा. सय्यद नगर, मोहम्मदवाडी रोड, हडपसर, पुणे) याच्यावर पुण्यात अनेक गुन्ह्याची नोंद होती. शाहरूखला अटक करण्यासाठी पुणे गुन्हे शाखा युनिट ६ चे पथक गेल्या अनेक दिवसांपासून त्याचा शोध घेत होते. शाहरूखने पोलिसांपासून वाचण्यासाठी पुण्यातून पळ काढला. व तो थेट मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथील त्याचे नातेवाईक राजू अहमद शेख याच्या नरुटे वस्ती येथील घरात दुसऱ्या मजल्यात आश्रयासाठी आला.गेल्या १५ दिवसांपासून तो त्या ठिकाणी राहत होता. दरम्यान, पुणे पोलिसांचे पथक त्याचा शोध घेत त्याच्या मागावरच होते. त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथे मोहोळ पोलिसांच्या मदतीने त्याला ताब्यात घेण्यासाठी आज पहाटे ३. ३० च्या दरम्यान दुसऱ्या मजल्यावर सापळा लावला. एका खोलीत कुटुंबासमवेत लपून बसलेल्या शाहरुख शेखला ताब्यात घेत असताना त्याने पोलिसांच्या दिशेने त्याच्या हातातील गावठी पिस्टलने फायर केली.

पोलीस पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी त्यांच्या सर्विस पिस्टल मधून स्वरक्षणासाठी शाहरुखच्या पायावर गोळी झाडली. त्यात तो जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. अट्टल गुन्हेगार शाहरुखचा पोलिसांच्या चकमकीत मृत्यू झाल्याच्या घटनेने गुन्हेगारी जगतात खळबळ उडाली आहे. सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे आदींसह पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. दरम्यान पोलिसांच्या फॉरेन्सिक टीम ने ही घटनास्थळी भेट देत आणखी तपासासाठी वेगवेगळे नमुने घेतले.